


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०२ ■ मंगळवार, दि.१२ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## एकाच दिवशी दोघांची आत्महत्या...

**अकोला:** बार्शीटाकळी पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे महान नजीकच्या धाबा रस्त्यावर एकाच दिवशी दोन व्यक्तींनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे, या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आत्महत्या केलेल्या व्यक्तींमध्ये किशोर सोनटक्के रा. कानडी बाजार, पोलीस स्टेशन पिंजर हद्द तसेच किशोर बोडके वय ४० वर्षे रा. मगरूळपीर यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या दोन्ही व्यक्तींबाबत पिंजर पोलीस स्टेशनमध्ये यापूर्वी मिसिंग दाखल करण्यात आले होते.


### सावधान! 'BG Wealth' आणि 'DSJ Exchange' कडून...

# गुंतवणुकीच्या नावाखाली कोट्यावधींची फसवणूक...!

## ॲडव्हान्स फी'च्या जाळयात अडकू नका

प्रतिनिधी १२ मे

**अकोला:** गुंतवणुकीवर अफाट परतावा देण्याचे आमिष दाखवून जगभरातील गुंतवणूकदारांना लुटणाऱ्या एका मोठ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा पर्दाफाश झाला आहे. 'BG Wealth' नावाची कथित गुंतवणूक संस्था आणि 'DSJ Exchange' PTYed Ltd' हे क्रिप्टो ट्रेडिंग प्लॅटफॉर्म फसवणूक करत असल्याचा गंभीर इशारा अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट डिपार्टमेंट ऑफ फायनान्शिअल इन्स्टिट्यूशन्स (DFIed) ने दिला आहे. असे असताना अकोल्यात लाखो रुपये अकोलेकरांनी गुंतविल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. असे असताना या कंपनीत अकोलेकर कुणाच्या मार्फत गुंतवणूक करत आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ रोख स्वरुपात लाखो रुपयांची गुंतवणूक करताना गुंतवणुकदारांचे फोटो व पॅनकार्ड, आधार कार्ड जमा करत




बोगस वेबसाईटवर गुंतवणुकदारांच्या खात्यात रक्कम टाकल्याचे दाखविले जात आहे. पण, त्याचा परतावा मिळण्याची शक्यता धुसर असून अकोलेकरांना कोट्यावधीचा हा गंडा असू शकतो.

ही कंपनी स्वतःला जगातील सर्वात मोठी 'हेज फंड' संस्था असल्याचे सांगते. सोशल मीडियाच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना आकर्षित केले जाते आणि 'स्टीफन बेअर्ड' नावाचा एक स्वयंघोषित प्रोफेसर लोकांना गुंतवणुकीचे सल्ले (Trading Signals) देतो. २,००० ळएअऊ ची गुंतवणूक केल्यास दरमहा १,५०० USDT आयुष्यभर मिळतील, असे खोटे आमिष दाखवून ही लूट केली जात आहे. सध्या क्रिप्टो आणि ऑनलाईन गुंतवणुकीच्या नावाखाली अकोला जिल्ह्यातही असे प्रकार वाढण्याची शक्यता आहे, तरी नागरिकांनी सतर्क राहावे.




### ॲडव्हान्स फी स्कॅम

अनेक गुंतवणूकदारांनी तक्रार केली आहे की, एकदा पैसे गुंतवल्यानंतर ते परत काढता येत नाहीत. जेव्हा गुंतवणूकदार पैसे काढण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्यांना 'व्हेरिफिकेशन फी', 'टॅक्स' किंवा 'कमिशन'च्या नावाखाली अतिरिक्त पैसे भरण्यास सांगितले जाते. यालाच 'ॲडव्हान्स फी स्कॅम' असे म्हणतात. एकदा अतिरिक्त पैसे भरले तरीही गुंतवणूकदारांना त्यांचे मूळ पैसे परत मिळत नाहीत. ही कंपनी व्हॉट्स ॲप, टेलिग्राम आणि 'बोनचॅट' सारख्या खाजगी चॅनेलवरून संवाद साधते. लक्षात ठेवा, अधिकृत गुंतवणूक कंपन्या अशा प्रकारे संवाद साधत नाहीत. 'झिरो रिस्क' (शून्य धोका) आणि अफाट नफ्याची हमी देणे, हे फसवणुकीचे लक्षण आहे.

### या फसवणुकीचा सिलसिला

तुमचे गमावलेले पैसे परत मिळवून देतो, असे सांगून काही लोक पुन्हा फी मागू शकतात. हे देखील 'रिकव्हरी स्कॅमर' असू शकतात. कोणत्याही कंपनीत गुंतवणूक करण्यापूर्वी त्यांचा परवाना आणि इतिहास 'FINRA Brokercheck' वर नक्की तपासा. एकदा क्रिप्टोमध्ये पाठवलेले पैसे परत मिळवणे अत्यंत कठीण असते, त्यामुळे सुरुवातीलाच सावध राहणे गरजेचे आहे.

## आदिवासी विकास मंत्र्याच्या स्वीय सहाय्यकाने केली श्री शंकरनाथ सेवा मंडळाची फसवणूक

### संस्थेचे सचिव श्रीनिवास महाजन यांची मंत्र्यांकडे तक्रार

प्रतिनिधी १२ मे

**मुंबई :** मूळचे वाशीम येथील रहिवासी असलेले आणि सद्या राज्याचे आदिवासी विकास मंत्री ना.डॉ.अशोक उईके यांचे स्वीय सहाय्यक असलेले शुभम खरटकर यांनी श्री.शंकरनाथ सेवा मंडळ मंदिर व्यवस्थापनाची फसवणूक करून विश्वासघात केला असल्याची तक्रार श्री शंकरनाथ सेवा मंडळ (गोरक्षनाथ आखाडा)चे सचिव श्रीनिवास महाजन यांनी ना.डॉ.अशोक उईके यांना दिलेल्या तक्रारीत केली आहे. शुभम खरटकर श्री शंकरनाथ सेवा मंडळ (गोरक्षनाथ आखाडा) यांचे मंदिरात तब्बल चार वर्ष विना मोबदला राहीलेत.



त्या चार वर्षात त्याने मंदिर व्यवस्थापनाच्या विश्वस्तांमध्ये भानगडी लावून मंदिराची सुद्धा बदनामी केली.तसेच हिंदू धर्म विषयक काम करणाऱ्या विश्वस्तांचा विश्वासघात केला असल्याचा आरोप मंदिराचे सचिव श्रीनिवास महाजन यांनी या तक्रारीत केला आहे.

मंत्री महोदयांच्या दालनात दररोज अनेक कर्मचारी, अधिकारी, पत्रकार , विरोधी पक्षातील माणसे येतात.मंत्र्यांच्या कार्यालयात सार्वजनिक हिताची कामे होतात.ही कामे करताना शुभम खरटकर अनेकांना चुकीची माहिती देवून आपल्या कार्यालयाची बदनामी करण्याची शक्यता असल्याचा आरोपही श्रीनिवास महाजन यांनी केला आहे. अशा विश्वासघातकी स्वीय सहाय्यक शुभम खरटकर यांना मंत्री महोदयांनी तात्काळ कार्यमुक्त करण्याची मागणीही मंदिराचे सचिव श्रीनिवास महाजन यांनी या तक्रारीमध्ये केली आहे.

शुभम खरटकर यांची राज्याचे आदिवासी विकास मंत्री ना. अशोक उईके यांचे स्वीय सहाय्यक म्हणून निवड करण्यासाठी मंत्री महोदयांच्या कार्यालयातील काही अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचीही चर्चा आहे.

### शुभम खरटकर 'विश्वासघातकी'- श्रीनिवास महाजन



शुभम खरटकर मंत्रालयात नोकरीवर लागल्यानंतर शुभमला आम्ही महाराजांचा सेवक म्हणून मंदिरात राहण्यासाठी जागा दिली.तो मंदिरात चार-पाच वर्षे विना मोबदला न देता म्हणजेच फुकटात राहीला.मंदिरात राहून त्याने त्याचा स्वार्थ साधला.पण त्याने नंतर मंदिराची बदनामी केली.हे शुभमचे कृत्य घृणास्पद असून तो विश्वासघातकी असल्याचा आरोप श्री शंकरनाथ सेवा मंडळाचे सचिव श्रीनिवास महाजन यांनी केला आहे.

## श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव जि. बुलढाणा

(पब्लिक ट्रस्ट रजि. नं. ए-२५० बुल.)

### * नम्र निवेदन *

श्री मंदिर परिसरातील पावित्र्य जपण्याकरिता तसेच श्री दर्शनार्थी भाविकांना श्रींचे सहज आणि सुरक्षित दर्शन व्हावे आणि गर्दीचे व्यवस्थापन प्रभावीपणे करता यावे, यासाठी श्रींचे मंदिर परिसरात मोबाईलचा वापर करण्यास सक्त मनाई आहे.

करिता श्री मंदिरात प्रवेश करतेवेळी मुख्य प्रवेशद्वारावर कटाक्षाने आपला मोबाईल बंद करावा. श्री मंदिर परिसरात मोबाईलचा वापर करताना निदर्शनास आल्यास आपला मोबाईल जमा करण्यात येईल. मोबाईल परत घेण्याकरिता होणारा मानसिक त्रास व आपला वेळ वाचविण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करून श्री संस्थेला सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

व्यवस्थापकीय विश्वस्त

## नीट ची परीक्षा रद्द; राष्ट्रीय चाचणी संस्थेचा निर्णय

प्रतिनिधी १२ मे

**मुंबई:** राष्ट्रीय चाचणी संस्थेने ३ मे रोजी होणारी नीट २०२६ परीक्षा रद्द केली आहे. परीक्षेच्या नवीन तारखा लवकरच जाहीर केल्या जातील. केंद्र सरकारच्या मान्यतेनुसार ही परीक्षा रद्द करण्यात आल्याचे NTA ने म्हटले आहे. भारत सरकारने असा निर्णय घेतला आहे की, येथे केलेल्या आरोपांची सखोल चौकशी करण्यासाठी या प्रकरणाची तपासणी केंद्रीय अन्वेषण ब्युरो (CBIed) मार्फत केली जावी. एनटीए (NTA) ब्युरोला पूर्ण सहकार्य करेल आणि तपासासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य, नोंदी आणि सहाय्य पुरवेल.




## शिवाजी आमचे, औरंगजेब आमचे

- काँग्रेस नगरसेवक आझाद खान बरळले
- फक्त सभागृह नेता महल्लेंनी खडसावले, इतरांची चुप्पी



प्रतिनिधी १२ मे

**अकोला :** ज्या मातीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष होतो, त्याच अकोला महानगरपालिकेच्या पवित्र सभागृहात एका नगरसेवकाने छत्रपती शिवराय आणि क्रूरकर्मा औरंगजेब यांची तुलना करण्याचे नीच धाडस केले. शिवाजी आमचे, औरंगजेब आमचे असे म्हणत नव्या वादाला तोंड फोडले आहे. या धक्कादायक प्रकारामुळे अकोलेकरांमध्ये संतापाची लाट उसळली असून, सर्वात मोठा प्रश्न हा उपस्थित होत आहे की, स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेणारे सत्ताधारी भाजप आणि शिवसेनेचे नगरसेवक यावेळी तोंडात बोटं घालून गप्प का बसले होते.

इतिहासात ज्या औरंगजेबाने महाराष्ट्रावर अन्याय केला, त्याची तुलना स्वराज्य संस्थापक शिवरायांशी करणे हा केवळ अपमान नसून महाराष्ट्राच्या अस्मितेवर झालेला मोठा हल्ला आहे. मात्र, इतका गंभीर प्रकार घडत असताना सभागृहातील वातावरण शांत कसे होते, याचे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.या कृत्याचा विरोध केवळ सभागृह नेत्यांनी केला. पण, बाकीच्या नगरसेवकांचे काय ? असा प्रश्न विचारला जात आहे. निवडणुकीच्या वेळी छत्रपतींचे नाव घेऊन मते मागणारे लोकप्रतिनिधी सभागृहात महाराजांचा अपमान होत असताना मूग गिळून का बसले होते? सत्तेच्या उबेत हे नगरसेवक इतके आंधळे झाले आहेत का, की त्यांना आपल्या आराध्य दैवताचा अपमान सहन झाला? अकोल्याच्या राजकीय वर्तुळात या 'मौन' संमतीची जोरदार चर्चा सुरू असून, हिंदुत्वाच्या गप्पा मारणाऱ्या या नगरसेवकांचा खरा चेहरा समोर आला असल्याची टीका होत आहे.

## गुरुवार, शुक्रवार उष्णतेची लाट...

**अकोला:** राज्यात पुन्हा एकदा उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. कोकण भागात उष्ण व दमट हवामान कायम असतानाच उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा तसेच विदर्भात उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. अकोल्यात सोमवारी सर्वाधिक ४५.१ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवण्यात आले.

## CLASSIFIED

### पाहिजे

पार्ट टाईम अँड फुल टाईम जॉब करीता मुले पाहिजेत...!

१) मार्केटिंगसाठी ३ मुले (२ व्हिलर, आणि मोबाईल आवश्यक) वेळ ९ ते ५

२) माल पोहचवायला २ मुले

-:संपर्क:-

**आदिराज इंटरप्रासेस**

प्लॉट नं. ५०७
नमुना गल्ली नं.४
राजकमल चौक, अमरावती
मो. 7028286766




CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
मंगळवार, दि. १२ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## उमरा गावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर संपन्न

**अकोट :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभाग यांच्या निर्णयानुसार अकोट तहसील कार्यालय अंतर्गत असलेल्या उमरा महसूल मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान चे आयोजन दि. ८ मे सकाळी १० वाजता उमरा येथील लोकमान्य विद्यालय उमरा येथील क्रिडा मैदानात पार पडणार पडले उमरा मंडळातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या सोयीसाठी महसूल विभागातील महत्त्वाच्या १५ सेवांचा लाभ एकाच छताखाली आणि एकाच दिवशी मिळवून देणे, हा या विशेष अभियानाचा मुख्य उद्देश होता समाधान शिबिरात भूमी अभिलेख ,आरोग्य विभाग, महावितरण विभाग, पशुसंवर्धन विभाग, बालकल्याण विभाग, पंचायत समिती विभाग, कृषी विभाग इत्यादी विभागातील बहुतांश अधिकारी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# दरवर्षी देशाला लागते इतके किलो सोने



मौल्यवान धातूंची ओढ भारतीयांच्या रक्तातच आहे. पण मित्रांनो, तुम्हाला माहिती आहे का ? गेल्या १० वर्षांत आपल्या देशाच्या तिजोरीत येणाऱ्या सोन्या-चांदीचा ओघ प्रचंड आटला आहे! होय, आकडेवारी तर हेच सांगतेय. पण यामागे नेमकं कारण काय? भाववाढ की बदललेली गुंतवणूक?.

अनेक जण म्हणतात २०१४-१५ हा काळ सोन्या-चांदीसाठी सुवर्णकाळ होता. सन २०१४-१५ मध्ये देशात ९ लाख १५ हजार किलो सोने आले होते. त्याच वर्षी चांदीने तर कहरच केला होता... तब्बल ७७ लाख किलो चांदी भारतात आयात झाली होती. पुढच्याच वर्षी, म्हणजे २०१५-१६ मध्ये सोन्याचा हा विक्रम मोडीत निघाला आणि आयातीचा आकडा ९ लाख ६८ हजार किलोवर पोहोचला. चांदीची आयातही ७४ लाख २८ हजार किलो एवढी प्रचंड होती.

पण आता चित्र बदललंय. २०२३-२४ या वर्षाकडे नजर टाकली, तर अंगावर काटा येईल. सोन्याची आयात घसरून थेट ७ लाख ४८ हजार किलोवर आली आहे. जी सन २०१५-१६ मध्ये ९ लाख ६८ हजार किलो होती. तर चांदीचा आकडा ७७ लाखांवरून थेट ६० लाख ५८ हजार किलोवर स्थिरावला. आणि सरत्या वर्षात अर्थात सन २०२४-२५ मध्ये ७ लाख ७५ हजार किलो सोने आले असले, तरी चांदीची आयात तर निम्म्यावर आली आहे... केवळ ५१ लाख ६४ हजार किलो!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल देशातील नागरिकांना पुढील एक वर्ष सोने विकत घेऊ नका असे सांगितले आहे. एक ग्रॅम सोने घेणाऱ्या गृहिणींपासून चाळीस चाळीस ग्रॅमच्या पाटल्या हातात मिरवणाऱ्या महिलांना कसे रोखले जाईल. सोन्या-चांदीचा तो जुना ओघ आता कमी झालाय. असे असताना पंतप्रधान मोदींनी सोने विकत घेऊ नका असे आवाहन केले असताना तुम्हाला काय वाटते सोने खरेदी थांबेल. लाखो किलो सोने दरवर्षी खरेदी केले जात असताना देशातील खरेदीला ब्रेक लागेल काय.

## बापरे देशात तेल खातात की पितात.....

पीएम मोदींनी देशात खाद्यतेल कमी खा असा सल्ला दिला आहे. जास्त वजन असलेल्या लोकांसाठी तो उत्तमच आहे. पण, देशात किती खाद्यतेलाचे उत्पादन होते आणि आपण किती खाद्य तेल इतर देशातून आयात करतो हे जर जाणून घेतले तर डोळे गरागरा फिरतील. पण, आम्ही तुम्हाला सोप्या भाषेत हे सर्व सांगणार

महिन्याला एखाद्या घरात तीन किलो तेल लागत असेल तर त्या घरात अर्थात इथे देश गृहित धरु त्या देशात सव्वा किलो तेल देशातील असते आणि पावणे दोन किलो खाद्यतेल हे विदेशातून आणावे लागत आहे. म्हणजे आपल्या कढईतील सव्वा किलो तेल घरचे आहे आणि पावणे दोन किलो खाद्यतेल हे शेजारच्या वहिनींनी दिलेले आहे. आणि हो ते तेल देताना त्याचे पैसे विदेशी डॉलर मध्ये आपल्या कडून घेतले गेले आहे.

देशाचा विचार केला तर देशाला दरवर्षाला जवळपास ३ हजार किलो अर्थात तीनशे लाख मेट्रीक टन खाद्य तेल लागते. त्यापैकी केवळ तेराशे चौदाशे हजार किलो तेल देशात तयार होते आणि विदेशातून सोळाशे तराशे हजार किलो तेल आपण विदेशातून आणतो. खाद्यतेलाबाबत आपण स्वयंपुर्ण नाही. पाम तेलाची आपली मागणी खुप मोठी आहे. पण, त्यासाठी इतर देशांवर अवलंबून रहावे लागते. देशात चारशे ते साडेचारशे लाख मेट्रिक टन खाद्य तेलबियांचे उत्पादन होते. पण, ते पुरेसे नाही. म्हणजे देशाची निम्मीपण गरज देशातून पुर्ण होत नाही ही मोठी खंत आहे.(पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कमी तेल खाण्याचे केलेले आवाहन तुम्ही कसे पाहता. गृहिणींच्या हातात, मातृशक्तीच्या हातात फोडणीचा तडका असून त्यासाठी आपण हजारो कोटी डॉलर विदेशात खर्च करत आहोत. एक एक डाव तेलाची फोडणी कमी केली तर मोठा फायदा देशाचा होईल.


- **नेहा पाटील,** अकोला.

## सोन्याची तस्करी... आकडा वाचून चक्रावून जाल!

चकाकणारं सोनं... कोणाला नको असतं ? पण याच सोन्याच्या हव्यासापोटी देशात तस्करीचं जाळं किती खोलवर पसरलंय, याचा कधी विचार केलाय ? विमानतळ असो वा समुद्रकिनारा, तपास यंत्रणांच्या डोळ्यात धूळ फेकून सोनं आणण्याचे प्रयत्न सतत सुरू असतात. पण आता जी आकडेवारी समोर आली आहे, ती पाहून तुमचे डोळे विस्फारल्याशिवाय राहणार नाहीत ! सोन्याची तस्करी ही सर्वाधिक वेळेस विमानतळावर उघडकीस आली आहे. गेल्या १० वर्षांत सोन्याच्या तस्करीने अनेक चढ-उतार पाहिले. पण २०१५-१६ मध्ये जेव्हा २,८१५ गुन्हे नोंदवले गेले, तेव्हा तब्बल २,९७२ किलो सोनं जप्त करण्यात आलं होतं. पुढच्या काही वर्षांत हा आकडा कमी-जास्त होत राहिला, पण २०१८-१९ मध्ये तस्करांनी जणू कहरच केला ! तब्बल ५,०९२ गुन्हे दाखल झाले आणि ४,२९२ किलो सोनं तपास यंत्रणांच्या हाती लागलं. याच वर्षात देशात सर्वाधिक सोन्याची तस्करी केल्या गेली. खरा धक्का तर गेल्या वर्षी बसला. सन २०२३-२४ मध्ये तस्करीचे सर्व जुने रेकॉर्ड मोडीत निघाले. या एकाच वर्षात ६,५९९ गुन्हे नोंदवण्यात आले आणि जप्त केलेल्या सोन्याचा आकडा होता तब्बल ४,९७१ किलो! विचार करा, यंत्रणांच्या हाती इतकं सोनं लागलं असेल, तर प्रत्यक्षात किती सोनं लंपास करण्याचा प्रयत्न झाला असेल. तस्कर आता अधिक सक्रिय झाले आहेत आणि त्यांचे मार्ग अधिक हायटेक बनले आहेत. सोन्याची ही तस्करी रोखण्यासाठी कस्टम आणि महसूल गुप्तवार्ता संचालनालय अहोरात्र मेहनत घेत आहेत. तुम्हाला काय वाटतं? ही तस्करी कधी थांबेल का? कमेंटमध्ये तुमचं मत नक्की सांगा !

- **कस्तुरी देशपांडे,** अकोला.

## अभियंत्यांच्या एकजुटीने राज्यात पाणी प्रश्नावर लोकचळवळ उभी राहील



राज्यात व देशात बदलत्या वातावरणाचे भयानक परिणाम आज दिसून येते आहेत. त्यामुळे नैसर्गिक वातावरणात होत असलेले बदल व त्यांचे परीणामाची चिंता ही आहेच. हा परीणाम देशातील लोकांच्या सामान्य जीवन ममानावर झाल्या शिवाय राहणार नाहीत याची माणवी ठेवून जिवन जगत असताना आजची परिस्थिती अंगीकारल्यावर होत आहे.

म्हणून मणसाकरीता ही धोक्याची घंटा ठरू नये यासाठी राज्यातील अभियंते यांच्या संघटनेने पुढाकार घेऊन अभियंतेच्या संस्थेच्या माध्यमातून पाणी या विषयावर राज्यात काम उभे करण्याची गरज अभियंत्यांच्या एकजुटीने समोर आणली आहे. याचेच महत्त्व जाणून आपली सामाजिक बांधिलकीची जवाबदारी त्यांनी शीकारली आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक माणसाने समोर येऊन त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत स्वागत ही करत आहेत. आजच्या परिस्थितीती पाहता हा कीती महत्त्वाचा प्रश्न आहे हे राज्यातील अभियंता यांनी पाणी प्रश्नावर एकजुट करून दाखवुन दिले.

जेंव्हा जेंव्हा अशी संकटे राज्यात व देशात येतात तेव्हा माणसांमधील माणूस जागा होतो आणि आपली सामाजिक बांधिलकीची जवाबदारी काय आहे याची ओळख तो स्वतःचा करून दूस-याला दिल्या शिवाय तो राहत नाही. वातावरणात आलेले बदल हे पुर्ण पृथ्वीवरील प्रत्येक माणसाला नव्हे तर संपूर्ण सजीव प्राणी घटकांसाठी ही धोक्याची घंटा आहे ही वेळ गेलीं तर आपणास कोणीही सुद्धा वाचवायला येणार नाही हे ही तेवढेच खरे आहे.

आज प्रत्येक माणूस आपल्या परीने निसर्गाने जि जवाबदारी आपल्यावर जन्मता टाकली तो ती निभवत आहे. कारण जन्मता माणूस आवड निवड घेऊन जन्माला येत नाही. त्याला जिवन जगताना जस जसे मोठे होत असताना वेगवेगळी काम करण्याची संधी मिळते किंवा तो माणूस म्हणून कामाचा शोध आपल्या गुणवत्तेची सिद्धता शोधत काम करण्याची इच्छा दाखवतो तशी त्यानुसार प्रत्येक माणसाची ओळख निर्माण होते.

आज पाण्यावर काम करण्याची संधी आपणास जलसंपदा विभागाने प्राप्त करून दिली आणि जलसंपदा च्या माध्यमातून पाणी वापर संस्थांना ही ती संधी मिळाली आहे. जलसंपदा विभागाच्या अभियंता यांचा आजपर्यंत असलेला पाण्याच्या संदर्भातील मोठा अनुभव तो लोकमुख झाला तर ही संधी अनेकांना प्राप्त होईल. आणि ही जनचळवळ बनेल. राज्यात अनेक लोकांचा पाणी ह्या प्रश्नावर अभ्यास नसतांना सामाजिक संस्था उभ्या करून ते लोक राज्यात काम करत आहेत. उदा, पाणी फोंडेशन,नाम फोंडेंशन, जैन संस्था अशा अनेक लहान मोठ्या संस्था काम राज्यात काम करताना दिसून येत आहेत. जलसंपदा विभागाने हे काम हाती घेतले तर संपूर्ण राज्यातील गावा गावात हे काम उभे व्हायला वेळ लागणार नाही येवढी ताकद आणि आपुलकी जलसंपदा विभागा मध्यें आहे म्हणून आपण पाण्याच्या प्रश्नावर केलेली एकजूट ही राज्यात एक लोकचळवळ म्हणून उभी करेल यात शंका नाही. हीच शुभेच्छा देतो आणि या चळवळीचा मी ही एक कार्यकर्ता होण्याची संधी मलाही प्राप्त होईल हीच प्रार्थना करतो पुढील वाटचालीस मनापासून शुभेच्छा.

**मनोज तायडे**
मनोज तायडे, अध्यक्ष पाणी वापर संस्था, कौलखेड जहांगीर

## वाढते तापमान जागतिक समस्या

वाढत्या जागतिक तापमानाची समस्या आज संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय बनली आहे. तापमान कमी करणे ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, ती प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. पृथ्वीचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी खालील उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत:

**वृक्षारोपण आणि वनसंवर्धन :** - झाडे कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ऑक्सिजन सोडतात. तापमान कमी करण्याचा हा सर्वात नैसर्गिक आणि प्रभावी मार्ग आहे. - जास्तीत जास्त झाडे लावा: मोकळ्या जागेत, घराच्या परिसरात आणि रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. - जंगलतोड थांबवणे: अस्तित्वात असलेली जंगले वाचवणे हे नवीन झाडे लावण्याइतकेच महत्त्वाचे आहे.

**सौर ऊर्जेचा वापर :**

- वीज निर्मितीसाठी कोळशाचा वापर केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर उष्णता आणि प्रदूषण निर्माण होते. -सौर पॅनेल: घराच्या किंवा इमारतीच्या छतावर सौर पॅनेल बसवून आपण नैसर्गिक ऊर्जेचा वापर करू शकतो. यामुळे वातावरणातील कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत होते.

प्रदूषणावर नियंत्रण : - वाहने आणि कारखान्यांमधून निघणारा धूर वातावरणात उष्णता पकडून ठेवतो. - सार्वजनिक वाहतुकीचा वापर: शक्य असेल तेव्हा खाजगी वाहनांऐवजी बस किंवा ट्रेनचा वापर करावा. - इलेक्ट्रिक वाहने : पेट्रोल-डिझेलच्या गाड्यांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य दिल्यास प्रदूषण कमी होईल.

**पाण्याचा काटकसरीने वापर :** - पाण्याचं दुर्भिक्ष्य तापमानात वाढ करण्यास कारणीभूत ठरते. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. - रेन वॉटर हार्वेस्टिंग: पावसाचे पाणी जमिनीत जिरवल्यामुळे जमीन थंड राहते आणि पर्यावरणाचा समतोल राखला जातो.

**प्लास्टिकचा वापर टाळणे :** - प्लास्टिकमुळे जमिनीचा कस कमी होतो आणि ते जाळल्यामुळे विषारी वायू हवेत मिसळतात, ज्यामुळे उष्णता वाढते. 'रिसायकल' आणि 'रियूज' या तत्त्वाचा अवलंब करणे गरजेचे आहे. - एअर कंडिशनचा (ँण) मर्यादित वापर: एसीमधून बाहेर पडणारी गरम हवा स्थानिक तापमानात वाढ करते. नैसर्गिक हवा खेळती राहील अशी घराची रचना असावी. - कचरा व्यवस्थापन: ओला आणि सुका कचरा वेगळा करून त्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास मिथेनसारख्या घातक वायूंचे उत्सर्जन कमी होते. - पृथ्वीचे तापमान कमी करणे ही एका दिवसाची प्रक्रिया नाही. जेव्हा आपण आपल्या सवयींमध्ये बदल करू आणि निसर्गाशी मैत्री करू, तेव्हाच भविष्यातील पिढीला आपण एक थंड आणि सुरक्षित पृथ्वी देऊ शकू.

## दिन विशेष

## आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन



जागतिक परिचारिका दिन दरवर्षी १२ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. आधुनिक शुश्रूषाशास्त्राच्या जनक फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि आरोग्य सेवेतील परिचारिकांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी हा दिवस समर्पित आहे.

आरोग्य सेवा ही केवळ डॉक्टरांच्या कौशल्यावर अवलंबून नसते, तर त्यामध्ये परिचारिकांचा वाटा अत्यंत मोलाचा असतो. डॉक्टर उपचार सुचवतात, पण त्या उपचारांची अंमलबजावणी करणे आणि रुग्णाची अहोरात्र सेवा करणे ही जबाबदारी परिचारिका पार पाडतात.

### जागतिक परिचारिका दिनाचा इतिहास

फ्लोरेन्स नाइटिंगेल यांनी 'क्रिमियन युद्धा'दरम्यान जखमी सैनिकांची सेवा करून परिचारिका व्यवसायाला एक नवी ओळख आणि प्रतिष्ठा मिळवून दिली. रात्रीच्या वेळी हातात कंदील घेऊन त्या रुग्णांची विचारपूस करायच्या, म्हणूनच त्यांना 'द लेडी विथ द लँप' असे म्हटले जाते. त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून १९७४ पासून अधिकृतपणे हा दिवस साजरा होऊ लागला.

### परिचारिकेची भूमिका आणि महत्त्व

परिचारिका म्हणजे केवळ औषधे देणारी व्यक्ती नव्हे, तर त्या रुग्णाला शारीरिक वेदनेतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करतात. आजारपणात खचलेल्या रुग्णाला आणि त्यांच्या नातेवाईकांना मायेचा शब्द देऊन धीर देतात. सण, उत्सव किंवा स्वतःचे वैयक्तिक प्रश्न बाजूला ठेवून त्या रुग्णालयात तत्पर असतात. औषधांच्या वेळा, स्वच्छता आणि डॉक्टरांच्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे ही त्यांची मुख्य जबाबदारी असते.

### बदलत्या काळातील आव्हाने

आजच्या धावपळीच्या युगात आणि नवनवीन आजारांच्या (उदा. कोव्हिड-१९ महामारी) काळात परिचारिकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता काम केले आहे. अनेकदा कामाचा प्रचंड ताण, अपुरी झोप आणि अपुरी संसाधने असतानाही त्या हसतमुखाने सेवा देत असतात.

### समाजाची जबाबदारी

आपल्याला निरोगी ठेवण्यासाठी झटणाऱ्या या 'पांढऱ्या गणवेशातील देवदूतांना' केवळ एका दिवसापुरते मर्यादित न ठेवता, वर्षभर त्यांचा आदर करणे गरजेचे आहे. त्यांना मिळणारे वेतन, सुरक्षितता आणि कामाचे वातावरण सुधारणे हाच खऱ्या अर्थाने या दिनाचा उद्देश असावा. 'रुग्णाची सेवा हीच ईश्वर सेवा' हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून काम करणाऱ्या सर्व परिचारिकांना मानाचा मुजरा! त्यांच्या निस्वार्थ सेवेमुळेच आज लाखो रुग्ण बरे होऊन घरी परततात. 'औषधोपचार शरीराला बरे करतात, पण परिचारिकेची माया मनाला उभारी देते.'

**जागतिक परिचारिका दिनाच्या सर्व परिचारिकांना शुभेच्छा!**

# दोनवेळा एव्हरेस्ट सर करणारी प्रथम गिर्यारोहक महिला संतोष यादव



संतोष यादव या दोनदा माउंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या जगातील पहिल्या महिला गिर्यारोहक आहेत. हरियाणातील एका लहान गावात जन्मलेल्या संतोष यादव यांनी कठीण सामाजिक परिस्थितीवर मात करत, मे १९९२ आणि १९९३ मध्ये सलग दोनदा एव्हरेस्ट शिखर सर करून इतिहास रचला. त्यांना २००० मध्ये भारत सरकारचा प्रतिष्ठित 'पद्मश्री' पुरस्कार मिळाला आहे.

संतोष यादव यांचा जन्म हरियाणातील रेवाडी जिल्ह्यातील जोनियावास गावात एका शेतकरी कुटुंबात झाला. माऊंट एव्हरेस्टवर दोनदा चढाई करणारी जगातील पहिली महिला. कांगशुंग फेसवरून (चीनच्या बाजूने) एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करणाऱ्या पहिल्या महिला. मे १९९२ आणि मे १९९३ मध्ये त्यांनी एव्हरेस्ट सर केले. त्यांना भारत सरकारचा 'पद्मश्री' पुरस्कार (२०००). 'नॅशनल ॲडव्हेंचर अवॉर्ड' (१९९४).

बहुचर्चित संतोष यादव यांचे नाव गिर्यारोहण क्षेत्रात अग्रेसर मानले जाते. याचे कारण म्हणजे विश्वातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर त्यांनी दोनवेळा सर केले. इतकेच नाही तर दुसऱ्यावेळी त्यांनी गिर्यारोहणासाठी चीनच्या बाजूने असलेल्या कांगशुंग या अतिशय कठीण व आव्हानात्मक मार्गाची निवड केली. नेपाळच्या वेळेनुसार सकाळी ७.१० ला त्यांच्या गटातील एकूण दहापैकी तीन जणांनी एव्हरेस्ट शिखरावर पोहोचून तिथे तिरंगा फडकावला. या तीन जणांमध्ये संतोष यादव या केवळ एकमेव महिला होत्या. इतकेच नव्हे तर संपूर्ण १० जणांच्या या गटाचे त्या नेतृत्व करीत होत्या. अंदाजे ८ हजार ८४८ मीटर उंचावर जिथे तापमान सामान्य तापमानापेक्षा ४०-५० डिग्रीने सेल्सिअसपेक्षाही कमी असते. अशा ठिकाणी तिरंगा फडकाविल्यावर संतोष यादव यांनी अत्यंत प्रसन्नचित्ताने आणि उत्साही आवाजात त्यांना भेट मिळालेल्या इरिडिअम सेटेलाईट फोनवरून सर्वप्रथम ही बातमी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना दिली. प्रत्युत्तरादाखल वाजपेयी यांनी संतोष यादव यांचे व त्यांच्या गटाचे अभिनंदन करून 'तुमच्या या कामगिरीचा देशाला अभिमान वाटेल' असे म्हटले. गिर्यारोहणात विक्रम स्थापित केल्यानंतर संतोष यादव यांनी सिव्हिल सर्व्हिस स्पर्धा परीक्षेत यश मिळवून त्या पोलीस अधिकारी झाल्या. सर्व क्षेत्रांत त्यांनी प्रसिद्धी व लोकप्रियता मिळविली. पुढे त्यांना खेळ जगतातील प्रतिष्ठित 'अर्जुन पुरस्कार' आणि 'पद्मश्री' या राष्ट्रीय सन्मानाने गौरविण्यात आले. एक यशस्वी गिर्यारोहक व पोलीस अधिकारी झाल्यावर त्यांनी वयाच्या ३५ व्या वर्षी विवाह केला व एक समर्पित पत्नी आणि आई म्हणूनही आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. पोलीस सेवेत असतानाही त्यांना सुट्ट्यांच्या दरम्यान गिर्यारोहण करण्याची सूट देण्यात आली होती; परंतु विवाहानंतर त्यांनी स्वेच्छेने हा मोह सोडला व एक अधिकारी, पत्नी आणि आई म्हणून त्या आपले कर्तव्य करू लागल्या. त्यांच्याच म्हणण्यानुसार 'या सर्व जबाबदाऱ्या सांभाळणे हे आव्हान कुठल्याही एव्हरेस्ट विजयापेक्षा कमी आहे का?'

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
मंगळवार, दि. १२ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## गर्भवती महिला निघाली अल्पवयीन, गुन्हा दाखल

**अकोला :** पारस येथील महिला प्रसुती करीता जिल्हा स्त्री रूग्णालयात दाखल झाली असता तिच्या जन्म तारखेवरून ती अल्पवयीन असल्यामुळे सदर प्रकरणी बाळापूर पोलिसांनी गुन्हा नोंदिवला आहे. या संदर्भात प्रसुतीसाठी दाखल झालेल्या महिलेच्या बयानावरून पती पत्नी सारखे राहत असतांना ती गर्भवती राहीली ती ८ महिन्याची गर्भवती असल्यामुळे प्रसुती करीता जिल्हा रुग्णालयात दाखल झाली. मात्र चौकशी दरम्यान सदर महिलेची जन्म तारीख ११/२/२००८ अशी असून आज तिचे वय १८ वर्ष २ महीने २८ दिवस आहे. जिल्हा स्त्री रूग्णालयातून मिळालेल्या मेमोनुसार बाळापूर पोलिसांनी कल्म ६४,६४(२)(m) बीएनएस सह कलम ४, ६ पोक्सो अन्वये विलास देविदास गायकी (३२) रा. पारस याचेविरूध्द गुन्हा दाखल केला.

# अकोलेकर अस्वच्छता, डासांच्या कचाट्यात !

## वंचितने सभेपूर्वी केले आंदोलन

प्रतिनिधी १२ मे

**अकोला :** अकोला महानगरपालिकेत सध्या विचित्र राजकीय परिस्थिती पाहायला मिळत आहे. शहराचे ज्वलंत प्रश्न ऐरणीवर असताना मुख्य विरोधी पक्ष असलेली काँग्रेस नेमकी कोणाच्या दावणीला बांधली गेली आहे, असा सवाल आता अकोलेकर विचारत आहेत. एकीकडे जनतेच्या प्रश्नांवर 'वंचित बहुजन आघाडी' एकट्याने दंड थोपटून मैदानात उतरली असताना, काँग्रेसचे नगरसेवक मात्र गायब असल्याचे चित्र आहे.




महानगरपालिकेच्या सभेपूर्वीच वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवकांनी प्रशासनाविरुद्ध जोरदार शड्डू ठोकला. मालमत्ता करात कचरा घंटागाडीचे वाढीव ६०० रुपये लावण्याच्या हालचाली प्रशासनाकडून सुरू आहेत. या अन्यायकारक दरवाढीला वंचितचे ज्येष्ठ नगरसेवक सुनील इन्नाणी यांच्या नेतृत्वात नगरसेवकांनी तीव्र विरोध दर्शवला. सर्वसामान्यांच्या खिशावर दरोडा टाकणारा हा वाढीव कर रद्द करावा, अशी मागणी करत वंचितने महापालिका परिसर दणाणून सोडला.

शहरात सध्या डासांचा प्रादुर्भाव प्रचंड वाढला असून डेंग्यू-मलेरियाचे संकट उभे ठाकले आहे. असे असतानाही महापालिकेचे प्रशासन मात्र गाढ झोपेत असल्याचे दिसते. 'शहरातील फॉगिंग मशिन्स नेमक्या गेल्या कुठे?' असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. फॉगिंग केवळ कागदावरच होत असून प्रत्यक्षात अकोलेकर डासांच्या कचाट्यात सापडले आहेत. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभाराचा वंचितने जाहीर निषेध केला.द्ध

### सी एस आर फंडातून कचरा घंटा गाड्या घेणार

अकोला महापालिकेत सी एस आर फंडातून कचरा घंटागाड्या घेणार आहे. कचरा उचलण्याचे पुर्ण काम हे महापालिका कंत्राटादाराला देणार असून सर्व कामाची एकच निविदा प्रस्तावितक करण्यात आली आहे. त्या दृष्टीने आज महापालिकेत विविध सदस्यांनी त्यांचे मते मांडली. वृत्त लिहेस्तोवर या विषयावर चर्चा सुरु होती. अकोला शहरातील कचरा समस्या बिकट झाली असून त्या विषयावर सत्तारुढ आणि विरोधकातील नगरसेवक त्रस्त झाले असून लोकांची ओरड सुरुच असल्याचे चित्र आहे. पण, महापालिका प्रशासनाची ढिसाळ भूमिका अधोरेखित होत असताना प्रशासन गप्प होते. तर एक वरिष्ठ अधिकारी बदलीच्या फिल्डिंग मध्ये मुंबईत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.



## पोटदुखे दांपत्य महात्मा ज्योतिबा फुले महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी १२ मे

**अकोट :** अनाथ सेवक सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित 'पर्व ८ वे' पुरस्कार सोहळा १० मे रोजी अहिल्यानगर येथील हॉटेल गोल्ड रोज येथे पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन संस्थापक तुषार अर्जुन बोरुडे यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले होते. महाराष्ट्रातील विविध भागातून सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण, आरोग्य व समाजसेवा क्षेत्रात निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या १६ मान्यवरांचा 'महात्मा ज्योतिबा फुले महाराष्ट्र रत्न पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. या प्रतिष्ठित पुरस्काराने अकोट येथील कौंतेय एज्युकेशन संचालक सौ. जयश्रीताई रविंद्र पोटदुखे व रविंद्र पोटदुखे यांना गौरविण्यात आले. शिक्षण घेत असलेल्या विद्यर्थी हा ट्रेसमघ्ये अभ्यार करीत असेल तर त्याता विकास होत नाहि अशा मुलांना व आई वडलांना समुपदेशन करुन बरेच विद्यार्थी व पालक यांना योग्यतो मार्ग दाखवला तसेच स्पर्धा परिक्षा सराव करणाऱ्या विद्यार्थी कराता दोन अभ्यासिका चालवत आहेत. येणाऱ्या शैक्षणिक वर्षात मराठी शाळांना अत्याधुनिक शिक्षण देन्याने ठरले मुख्य उद्देश हाच आहे की मराठी शाळा बंद पडायला नको म्हणुन जनजागृती करीत आहेत व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच सामाजिक जाणीव जागृतीसाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला.

## के. एम. असगर हुसेन हायस्कुलचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल १००टक्के



प्रतिनिधी १२ मे

**अकोला :** महात्मा गांधी एज्युकेशन सोसायटी वाडेगाव तालुका बालापुर जिल्हा अकोला द्वारा संचालित के एम अजहर हुसेन उर्दू हायस्कूल घोडेगाव तालुका तेल्हारा फेब्रुवारी मार्च २०२६ मध्ये आयोजित माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षा परीक्षेत शंभर टक्के निकालाची उज्वल कामगिरी करत यशाचा नवा मॉपदंड प्रस्थापित केला आहे.

प्रशिक्षक परीक्षेत प्रविष्ट एकूण ३३ पैकी ३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यामध्ये सात विद्यार्थी प्रवीण श्रेणीत पाच प्रथम श्रेणीत तर वीस विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले कुमारी अफीफा मोहम्मद मुजमील ८३.८० टक्के गुण प्राप्त करून शाळा स्तरावर प्रथम स्थान कु तुबा तसनीम तुफेल अहेमद ८३.६० तर हमना फिरदोस सरफराज उल्ला खान ८३.३० तृतीय स्थान पटकावला विद्यार्थ्यांचे अंथक परिश्रमाला शिक्षकाचे योग्य मार्गदर्शन पालकांच्या सहकार्य विद्यालयाचे शैक्षणिक वातावरणाची सुंदर साथ लाभल्याने यश संपादन करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# अ‍ॅटोक्रॅट कोचिंग क्लासेसची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

### दहावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश

प्रतिनिधी १२ मे

**अकोला :** अ‍ॅटोक्रॅट कोचिंग क्लासेसने पुन्हा एकदा उत्कृष्टतेची परंपरा कायम राखत एसएससी बोर्ड परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन केले आहे. संस्थेने शहरातील सर्वोत्कृष्ट टक्केवारी निकालांपैकी एक निकाल नोंदवत शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ५३ विद्यार्थ्यांपैकी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत संस्थेच्या सातत्यपूर्ण गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.

संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये रफान आबीर ९८.४० टक्के, सोहेरा नियाझी ९८.४० टक्के, फैसल अहमद खान ९६.६० टक्के, रुकय्या बचाव ९६.४० टक्के, सानिया शेख ९६.०० टक्के, आकांक्षा गुंजाळ ९४.०० टक्के, रोहान अहमद ९४.०० टक्के, हबीब अन्सारी ९३.६० टक्के, हानिया मरियम ९३.४० टक्के, मोहम्मद अय्यान ९३.०० टक्के, आसिम खान ९२.४० टक्के, मुर्तुझा हुसेन ९२.२० टक्के, रेहान शेख ९२.०० टक्के, कार्तिक जोशी ९१.८० टक्के, अहमद तबानी ९०.८० टक्के, मोहम्मद आमिर ९०.८० टक्के, जोया गाझी ९०.६० टक्के, खुशी जोशी ९०.०० टक्के, शुभ जोशी ९०.०० टक्के. विशेष उल्लेखनीय म्हणजे सोहेरा नियाझी हिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले. सानिया शेख हिने संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले. ५३ पैकी २२ विद्यार्थ्यांनी गणित विषयात ९० पेक्षा अधिक गुण मिळवले. ५३ पैकी २३ विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयात ९० पेक्षा अधिक गुण मिळवले. ५३ पैकी १६ विद्यार्थ्यांनी सामाजिक शास्त्र विषयात ९० पेक्षा अधिक गुण मिळवले. १९ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक गुण मिळवले. ४१ विद्यार्थ्यांनी ८० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले.



### गणित विषयात २२ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा अधिक गुण.

विज्ञान विषयात २३ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा अधिक गुण. सामाजिक शास्त्र विषयात १६ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा अधिक गुण मिळाले. गुणवर्गानुसार निकाल असा आहे. ९६ टक्के पेक्षा अधिक गुण ५ विद्यार्थ्यांना, ९० टक्के ते ९६ टक्के १४ विद्यार्थी, ८५ टक्के ते ९० टक्के १२ विद्यार्थी, ८० टक्के ते ८५ टक्के १० विद्यार्थी. ५३ पैकी १९ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले.

### ५३ पैकी २२ विद्यार्थ्यांनी ८० ते ९० टक्के गुण मिळवले

संस्थेच्या टॉप ५ विद्यार्थ्यांपैकी ४ विद्यार्थी माउंट कार्मेल मधील असून १ विद्यार्थी होलिक्रॉस कॉन्व्हेंट मधील आहे. विशेष म्हणजे, संस्थेतील अव्वल दोन विद्यार्थ्यांनी आपल्या शाळांच्या टॉप ५ गुणवंत विद्यार्थ्यांमध्येही स्थान मिळवले आहे.

संस्थेचे संचालक शारिक डोकडिया सर यांनी स्वतः गणित आणि विज्ञान विषयांचे मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना योग्य दिशा दिली. त्यांची उत्कृष्ट अध्यापन पद्धती, नियोजन आणि मेहनतीमुळे विद्यार्थ्यांनी हे घवघवीत यश संपादन केले. या शानदार निकालामुळे अ‍ॅटोक्रॅट कोचिंग क्लासेसने शहरातील एसएससी शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य संस्थांमध्ये आपले स्थान पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. संस्थेच्या व्यवस्थापनाने सर्व विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## १० तासानंतर अजगराला शोधण्यात यश



**कुटासा :** गावाजवळ तलावाच्या पाईपखाली मोठा अजगर दिसल्याने गावकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. ज्या ठिकाणी अजगर दिसला त्याच ठिकाणी अजगराचे मोठे अंडे सुद्धा दिसुन आल्याने गावात खळबळ उडाली होती. या घटनेची माहिती गावासह परीसरात वाऱ्यासारखी पसरताच गावासह परीसरात ग्रामस्थांनी या ठिकाणी अजगराला पाहण्यासाठी एकच गर्दी केली होती. १० तासानंतर अखेर अमरावती येथील वाईल्ड फाऊंडेशन रेस्क्यू टिम व ग्रामस्थांनी अजगर शोध मोहीम सुरु केली व रात्री ११ वाजता बिळात लपलेल्या अजगराला पकडण्यात वाईल्ड फाऊंडेशन रेस्क्यू टिमला यश आले. अजगराला बाहेर काढत रेस्क्यू टिमने सोबत नेल्याने गावकऱ्यांचा जीव अखेर भांड्यात पडला.

## हिवरखेड सोनाळा राज्य महामार्गावर धुळीचे वास्तव्य

**हिवरखेड :** हिवरखेड सोनाळा जळगाव राज्य महामार्गावर धुळीने डेरा जमून ठेवला आहे. सध्या जिकडे तिकडे लग्न तिथी विविध कार्यक्रमाची रेलचेल दिसून येत आहे, असेच उदाहरण हिवरखेड सोनाळा या मार्गावर नवीन नाही. या मार्गावर अनेक प्रवासी ये जा करतात.

यात मॉर्निंग वॉक करणारे, शेतकरी, व्यापारी, भाविक भक्त आहेत. सध्या लग्न समारंभात जाणारे अधिक जास्त प्रवास आहेत. त्यांना जाताना डोक्यावर, डोळ्यात, कपड्यावर न्यावी लागते धुळ.

या धुळीने मुळे प्रवाशांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे, नवलचे असे या रोडवर काम सुरू असताना सबंधित ठेकेदार देखाव्यासाठी तात्पुरते कुठे कुठेच टँकरने पाणी देत आहेत, जसे पाहिजे तसे पाणी या रोडवर देत नाही आहेत, नाइलाजाने काही शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पाणी रोडवर पिकर द्वारे दिले तरीही मात्र सबंधिताना जाग आली नाही,

असेच जर चालत राहिले तर या रोडवर मोठ मोठे अपघात होण्याची शक्यता दर्शवली जाते.

## अकोट फाईल पुलावर रेलिंग बसवले जाताहेत

**अकोला :** नेहमी वर्दळीचा तसेच सुरळीत रहदारीसाठी त्रासदायक अशा अकोट फाईल पुलावर रेलिंग बसवले जात आहे. कारण पुलाचे कठडे जीर्ण झाले होते. ठिकठिकाणी तुटले होते. याबाबत ओरड होत होती.

सध्या या भागात कामे सुरू असल्याने वाहन चालकांनी दक्षता बाळगणे आवश्यक आहे. अकोला शहरात वाहनांची गती नेहमी प्रमाणे असते. कामे सुरू असली तरी आपल्या धुंदीत वाहने चालवली जातात. काही मुजोर युवक वाहतूक पोलिसांना जुमानत नाही. ट्रिपल सीटवर सिग्नल तोडतात आणि तेही समोर वाहतूक पोलिस असताना.



कशाची भीती वाटत नाही. कोणी हटकले तर मारामारी करायला तयार. अशा प्रवृत्ती शहरात डोके वर काढत आहेत. त्यांचा बंदोबस्त करावा लागणार आहे. अकोट फाईल पुलावरून जाताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

# 135 किलो गोमांसासह 3 मोटारसायकली जप्त

प्रतिनिधी १२ मे

**कुटासा :** दहीहांडा पोलीस स्टेशन हद्दीत पहाटेच्या सुमारास पोलिसांनी मोठी कारवाई करत गोमांस वाहतुकीचा प्रकार उघडकीस आणला आहे. गोमांस वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलिसांनी विशेष पथक तयार करून सलग तीन ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत १३५ किलो गोमांसासह तीन मोटारसायकली व तिन जणांना ताब्यात घेऊन एकूण २ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार दिनांक १० मे २०२६ रोजी पहाटे ४ वाजताच्या सुमारास पोलिसांना गोमांस वाहतुकीबाबत माहिती मिळाली होती. त्यानुसार दहीहांडा पोलिसांनी विविध ठिकाणी सापळे रचत कारवाई केली. पहिली कारवाई ग्राम कुटासा स्मशानभूमीजवळ करण्यात आली. यावेळी आरोपी अब्दुल बशीर शेख अखिल ( वय ५५ रा. दहीहांडा) याच्या ताब्यातून अंदाजे ५० किलो



गोमांस आणि होंडा शाईन मोटारसायकल असा एकूण ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तर

### तीन जणांना अटक

दुसरी कारवाई ग्राम कुटासा बसस्टॉप परिसरात करण्यात आली. येथे मोहम्मद शहजाद अब्दुल बशीर (वय २४ रा. दहीहांडा) याच्याकडून ४० किलो गोमांस आणि हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल असा ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर तिसरी जप्त करण्यात आला. तर तिसरी कारवाई कावसा प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ करण्यात आली. या ठिकाणी शेख राजा शेख अमीर ( वय ३१ रा. पिंपळद ता. दर्यापूर जि. अमरावती) याच्याकडून ४५ किलो गोमांस आणि स्प्लेंडर मोटारसायकल असा ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या तिन्ही कारवायांमध्ये पोलिसांनी १३५ किलो गोमांस आणि तीन मोटारसायकली जप्त केल्या असून एकूण मुद्देमालाची किंमत २ लाख ७ हजार रुपये असल्याचे कळते.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा
इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. १२ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# इसापूर धरणातून पाणी विसर्गाचे आदेश; उमरखेड तालुक्यातील ३२ गावांना दिलासा

**पाणीटंचाई निवारणासाठी प्रशासनाची उपाययोजना; नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन**

प्रतिनिधी १२ मे

**यवतमाळ :** यवतमाळ आणि नांदेड जिल्ह्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांना दिलासा देण्यासाठी इसापूर धरणातून पाणी सोडण्याचे आदेश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील ३२ गावांना मोठा दिलासा मिळणार आहे.

प्रशासनाच्या आदेशानुसार यवतमाळ जिल्ह्यासाठी ९ दलघमी तर नांदेड जिल्ह्यासाठी ३ दलघमी पाणी सोडण्यात येणार आहे. इसापूर धरणातून थेट पाणी सोडण्यासाठी स्वतंत्र विमोचक उपलब्ध नसल्याने नियमित कालवा आवर्तनाशी संलग्न विमोचकाद्वारे ५ एप्रिलपासून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ मेअखेर एकूण १२ दलघमी मागणीपैकी ६.८१ दलघमी पाणी नाल्याद्वारे प्रवाहित करण्यात आले आहे. उमरखेड तालुक्यातील टाकळी, राजापूरवाडी, चालगणी, साखरा, खरुस, लोहरा, कारखेड, देवसरी, दिघडी, ऊंचवडद, सिंदगी, गांजेगाव, सावळेश्वर, भोजनगर, बिटरगाव, रतननाईकनगर, बोडका, पिंपळगाव, पेंदा, लिंगी, मुरली, मुळावा, हातला, दिवट, पिंपरी, पळशी, नागापूर, बाराचातारी, बोरी, कोप्रा आणि मानकेश्वर या गावांसाठी पाणी सोडण्यात आले आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील २५ गावांनाही या निर्णयाचा लाभ होणार आहे.

दरम्यान, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभागाने नागरिकांनी पाण्याचा वापर जपून आणि नियोजनपूर्वक करण्याचे आवाहन केले आहे. कालवा किंवा नाल्यातून बेकायदेशीर पाणी उपसा करू नये तसेच पाण्याची नासाडी टाळावी, जेणेकरून सर्व गावांना समप्रमाणात पाणी उपलब्ध होईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पाणीटंचाई निवारणासाठी जलसंपदा विभाग कटिबद्ध असून उर्वरित पाण्याचे नियोजनही ठरलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# ॲल्युमिनियम वायर चोरीचा पर्दाफाश; दोन आरोपींना अटक

प्रतिनिधी १२ मे



**यवतमाळ :** घरफोडी करून ॲल्युमिनियम वायरची बंडले चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अवधूतवाडी पोलिसांनी अटक करत सुमारे १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली.

विजय अजबराव इंगळे (वय २७, रा. अंबानगर), अंकुश ज्ञानेश्वर इंगोले (वय ३०, रा. अंबानगर) अशी आरोपींची नावे आहे. भाग्योदय सोसायटी, वडगाव येथील रहिवासी कुणाल देवराव राडे यांनी त्यांच्या घरातून पाच ॲल्युमिनियम वायरची बंडले चोरीस गेल्याची तक्रार अवधूतवाडी पोलीस ठाण्यात दिली होती. राडे हे २२ एप्रिल रोजी कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि वायरची बंडले चोरी करून नेली. १० मे रोजी ते घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५, ३३१(३) व ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

जिल्ह्यातील घरफोडी आणि चोरीच्या घटनांची उकल करण्याच्या सूचनांनुसार पोलिसांनी तपास सुरू केला. पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे यांच्या नेतृत्वात गुन्हे शोध पथकाने तपासाची चक्रे फिरवली.

तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे विजय अजबराव इंगळे (वय २७, रा. अंबानगर) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने अंकुश ज्ञानेश्वर इंगोले (वय ३०, रा. अंबानगर) याच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींकडून चोरीस गेलेले पाच ॲल्युमिनियम वायरचे बंडल, अंदाजे १ लाख ७० हजार ५३२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींकडून आणखी काही गुन्ह्यांची माहिती मिळते का, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार, उपनिरीक्षक सुरज जगताप, सुरेश मेश्राम, पोलीस हवालदार विशाल भगत, बलराम शुक्ला, रुपेश ढोबळे तसेच पोलीस शिपाई मोहम्मद भगत, वाले, सचिन राठोड, राज कांबळे आणि योगेश चोपडे यांच्या पथकाने पार पाडली.

# शमसुल उलूम उर्दू हायस्कूलचा दहावी निकाल ९८.२१ टक्के

प्रतिनिधी १२ मे

**पुसद :** मुस्लिम मायनॉरिटी सोशल वेल्फेअर अँड एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित शमसुल उलूम उर्दू हायस्कूल, पुसदने सन २०२६ च्या दहावी परीक्षेत घवघवीत यश संपादन करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

यावर्षी विद्यालयातील एकूण ५६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा निकाल ९८.२१ टक्के लागला आहे. निकालामध्ये १८ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळविले, तर २४ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी संपादन केली आहे. तसेच १३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अकील मिर्झा, सचिव अब्दुल रहमान, उपाध्यक्ष शेख अतीक, सहसचिव शोएब खान तसेच संस्थेच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळेचे मुख्याध्यापक शेख परवेज यांनीही विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पारा ४१.४ अंश; उकाडा वाढला

प्रतिनिधी १२ मे

**यवतमाळ :** जिल्ह्यात सलग दोन दिवस अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता. हा आनंद औट घटकेचा ठरला असून तापमानाचा पारा पुन्हा सोमवारी ४१.४ अंशावर पोहोचला आहे. यासोबतच पावसामुळे वातावरणात प्रचंड उकाडा वाढला आहे. सावलीतही अंगाला घामाच्या धारा लागत आहेत.

# ट्रान्सपोर्टच्या आड गुटखा तस्करी; १.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**यवतमाळ शहर पोलिसांची धाड; प्रतिबंधित पान मसाला व सुगंधित तंबाखू हस्तगत**

प्रतिनिधी १२ मे



**यवतमाळ :** ट्रान्सपोर्ट व्यवसायाच्या आड प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित तंबाखूची साठवणूक केल्याचा प्रकार यवतमाळ शहरात उघडकीस आला. यवतमाळ शहर पोलिसांच्या डी.बी. पथकाने छोटी गुजरी परिसरात धाड टाकून तब्बल १ लाख ६६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी संबंधित ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांविरुद्ध पुढील कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथील डी.बी. पथकाला गोपनीय माहितीदारामार्फत छोटी गुजरी येथे गुटख्याचा साठा उतरविण्यात आल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ९ मे रोजी घटनास्थळी धाड टाकली.

कारवाईदरम्यान बाजीराव गोल्ड पान मसाला किंमत ७६ हजार ८०० रुपये आणि मस्तानी सुगंधित तंबाखू किंमत १६ हजार रुपये असा एकूण ९२ हजार ८०० रुपयांचा प्रतिबंधित साठा आढळून आला.

त्यानंतर देवीका ट्रान्सपोर्टचे मालक युफीयान खान बशीर खान (वय २३, रा. आदर्श नगर, पांढरकवडा रोड, यवतमाळ) यांच्या गॅरेजमध्ये पोलिसांनी तपास केला. तेथे बाजीराव गोल्ड पान मसाला किंमत ५१ हजार २०० रुपये आणि मस्तानी सुगंधित तंबाखू किंमत २२ हजार ४०० रुपये असा एकूण ७३ हजार ६०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

दोन्ही ठिकाणांहून एकूण १ लाख ६६ हजार ४०० रुपयांचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी अमितकुमार अशोककुमार उपलप यांनी फिर्याद दिल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने आणि पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक गणेश सपकाळ, परीविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक दीपक घोगरे, पोलीस हवालदार रावसाहेब शेंडे, किरण पडघण, नापोको प्रविण खंडारे, पोलीस शिपाई गौरव ठाकरे, पवन नांदेकर, पवन तडसे, मयूर तेल्लेवार तसेच अन्न सुरक्षा अधिकारी अमितकुमार अशोककुमार उपलप यांनी सहभाग घेतला.

# अवैध कत्तलखान्यांवर पोलिसांचा छापा; १४ जनावरांची सुटका

प्रतिनिधी १२ मे

**दिग्रस :** शहरातील अवैध कत्तलखान्यांविरोधात दिग्रस पोलिसांनी मोठी कारवाई करत १४ गोवंशीय जनावरांची सुटका केली असून सुमारे २०० किलो गोवंश मांस जप्त केले आहे. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दिग्रस पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी डॉ. तेजस सारडा यांच्या नेतृत्वाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. पोलिसांना मोतीनगर परिसरातील काही ठिकाणी गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तातडीने छापे टाकले. या कारवाईत मोहम्मद अस्लम शेख उस्मान (३०), आवेश शेख रफीक (२७) आणि अजहर शेख हुसेन (४०, सर्व रा. मोतीनगर, दिग्रस) यांच्या ताब्यात १४ गोवंशीय जनावरे जिवंत अवस्थेत आढळून आली. जनावरांना अमानुषपणे बांधून ठेवण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. सर्व जनावरांची सुटका करून त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

दरम्यान, आणी नाका आणि मोतीनगर परिसरात करण्यात आलेल्या दुसऱ्या कारवाईत मोहम्मद तौफिक अब्दुल खलिल (३२) व मोहम्मद वाजिद मोहम्मद गफ्फार (२७) यांना गोवंश मांस कापताना पोलिसांनी पकडले. आरोपींकडून सुमारे २०० किलो गोवंश मांस, सु-या, वजन काटा तसेच मांस कापण्याचे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ मधील सुधारित कलम ५(अ), ५(ब) तसेच अन्य संबंधित कलमान्वये दिग्रस पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# घरफोडीत २.२२ लाखांचा मुद्देमाल लंपास

प्रतिनिधी १२ मे

**उमरखेड :** तालुक्यातील कुपटी येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोफळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुमन दिगांबर सूर्यवंशी (वय ६१, रा. कुपटी, ता. उमरखेड) या आपल्या कुटुंबासह नव्या घरात वास्तव्यास आहेत. त्यांचे जुने घरही परिसरातच असून तेथे पाण्याची मोटार व काही मौल्यवान वस्तू ठेवण्यात आल्या होत्या.


दिनांक १० मे रोजी सायंकाळी त्या जुन्या घरी गेल्या असता, प्लास्टिकच्या ड्रममध्ये ठेवलेल्या स्टीलच्या पेटीत सोन्याचे दागिने व रोख रक्कम ठेवून त्या परत नव्या घरी आल्या होत्या. मात्र ११ मे रोजी पहाटे पाण्याची मोटार सुरू करण्यासाठी त्या पुन्हा जुन्या घरी गेल्यानंतर घरातील दोन्ही खोल्यांची कुलपे तुटलेली आढळली. घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते, तसेच ओसरीतील टिनपत्रे उचकटून चोरट्यांनी घरात प्रवेश केल्याचे स्पष्ट झाले. ड्रममध्ये ठेवलेली स्टीलची पेटी बाहेर तुटलेल्या अवस्थेत आढळली असून त्यातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरीला गेल्याचे उघड झाले. चोरीस गेलेल्या मुद्देमालात सोन्याच्या बिंदल्या, मंगळसूत्र, कानातील दागिने, आठ अंगठ्या तसेच १ लाख २० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण २.२२ लाखांचा ऐवज आहे.

या प्रकरणी पोफळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सीसीटीव्ही फुटेज तपास सुरू केला आहे. तसेच डॉग स्क्वॉड, फिंगरप्रिंट तज्ज्ञ आणि एफएसएल पथकालाही पाचारण करण्यात आले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून पुढील तपास सुरू आहे.

# अधिक मासामुळे विवाह सोहळ्यांना ब्रेक

**१७ मे ते १५ जूनदरम्यान शुभमंगलकार्य बंद**

प्रतिनिधी १२ मे



**उमरखेड :** यावर्षी अधिक मास सुरू होत असल्याने राज्यभरात विवाह सोहळे, वास्तुशांती, गृहप्रवेश यांसारखी शुभमंगलकार्ये जवळपास महिनाभरासाठी थांबणार आहेत. हिंदू पंचांगानुसार १७ मे ते १५ जून या कालावधीत अधिक मास असल्याने या काळात कोणतेही मंगलकार्य केले जात नाही.

'पुरुषोत्तम मास' किंवा ग्रामीण भागात ओळखल्या जाणाऱ्या 'धोंड्याचा महिना' या कालावधीत धार्मिक परंपरेनुसार विवाह, गृहप्रवेश, नवीन खरेदीचे मोठे कार्यक्रम तसेच इतर शुभकार्ये टाळली जातात. त्यामुळे उन्हाळ्यातील लग्नसराईतच आलेल्या या ब्रेकमुळे अनेक कुटुंबांच्या नियोजित विवाह सोहळ्यांना पुढे ढकलावे लागणार आहे.

या निर्णयाचा थेट परिणाम मंगल कार्यालये, आचारी, कॅटरिंग व्यवसाय, बँड पथक, डीजे, फुलवाले तसेच पुजारी यांसारख्या अनेक संबंधित व्यावसायिकांवर होणार आहे. लग्नसराईतच आलेल्या या एका महिन्याच्या थांबामुळे आर्थिक उलाढालीवर मोठा फटका बसण्याची शक्यता व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. काही व्यावसायिकांनी आधीच बुकिंग झालेल्या तारखा पुढे ढकलाव्या लागल्याने अडचणी वाढल्या आहेत.

दुसरीकडे, अधिक मासात जावयांचा सन्मान करण्याची परंपरा ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणात पाळली जाते.

या काळात जावयांना सासरी आमंत्रित करून त्यांचा मान-सन्मान केला जातो. त्यांना कपडे, चांदी-सोन्याचे आहेर तसेच पारंपरिक पदार्थ म्हणून अनारसे व धोंडे दिले जातात. त्यामुळे विवाहसोहळ्यांना ब्रेक असला तरी काही कौटुंबिक परंपरा या काळात सुरू राहतात.

तुळशी विवाहानंतर जानेवारीपासून सुरू झालेला लग्नसराईचा हंगाम मे महिन्याच्या मध्यापर्यंत मोठ्या प्रमाणात चालतो.

त्यानंतर अधिक मास व पुढे पावसाळ्याची सुरुवात यामुळे शेतकरी वर्गही विवाह उरकण्यावर भर देतो. यावर्षी मात्र सामूहिक विवाह सोहळ्यांचे प्रमाण तुलनेने कमी दिसून आले असून, थाटामाटात विवाह करण्याची वाढती स्पर्धा ग्रामीण व शहरी भागात कायम आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी कृषी विभागाला निवेदन

**योजनांची प्रभावी अंमलबजावणी, बियाणे-खत पुरवठा व पीकविमा लाभाची मागणी**

प्रतिनिधी १२ मे



**आर्णी :** खरीप हंगाम २०२६-२७च्या पूर्वतयारीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध कृषी समस्यांबाबत तसेच शासनाच्या कृषी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा माजी कामगार उपआयुक्त राजेश आडे यांच्या नेतृत्वाखाली तालुका कृषी अधिकारी, आर्णी यांना निवेदन देण्यात आले.

शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पारदर्शक आणि प्रभावीपणे पोहोचणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नियमित व वेळेवर अनुदान मिळावे, यासाठी ई-केवायसी, आधार लिंकिंग आणि बँक खात्यांतील त्रुटी दूर करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करण्याची मागणी करण्यात आली.

> ■ खरीप हंगामासाठी आवश्यक बियाणे, खते व कीटकनाशकांचा पुरेसा साठा उपलब्ध करून कृत्रिम टंचाई टाळावी, तसेच जादा दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत मंजूर कामांच्या गुणवत्तेची नियमित तपासणी करून पात्र शेतकऱ्यांना योजनांचा लाभ पारदर्शकपणे देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेततळे, बंधारे, नाला खोलीकरण, वृक्षलागवड व सिंचन सुविधा यांसारख्या कामांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सन २०२५-२६ मधील कार्यवाहीची माहिती जाहीर करून नुकसान भरपाई प्रस्तावांची सद्यस्थिती शेतकऱ्यांना कळवावी, तसेच पात्र लाभार्थ्यांना वेळेत विमा मिळण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली.

अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, गारपीट व नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे तातडीने करून मदत प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची मागणी निवेदनात करण्यात आली. गावस्तरावर आधुनिक शेती तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, पाणी व्यवस्थापन व यांत्रिकीकरणाबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत, तसेच कृषी सहाय्यकांनी नियमित गावभेटी घेऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून त्यांचे तातडीने निराकरण करावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ) व शेतकरी गटांना प्रोत्साहन देऊन शेतीमाल प्रक्रिया, साठवणूक व बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची मागणी करण्यात आली. मागण्यांवर तातडीने सकारात्मक कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदन सादर करताना राजेश आडे यांच्यासह तालुक्यातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

# लक्ष्मीकांत लोळगे यांना 'महाराष्ट्र सुवर्ण रत्न' पुरस्कार



प्रतिनिधी १२ मे

**यवतमाळ :** नागपूर येथे महाराष्ट्र सुवर्णकार संस्था व मासिक 'सुवर्णलंकार'तर्फे आयोजित देशव्यापी सोनार महोत्सवात यवतमाळचे समाजसेवक लक्ष्मीकांत घनश्याम लोळगे यांना 'महाराष्ट्र सुवर्ण रत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. सोनार सेवा महासंघाचे विदर्भ अध्यक्ष म्हणून त्यांनी समाज एकत्रीकरण, ओबीसी चळवळ तसेच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांत सक्रिय योगदान दिले आहे. सोनार समाज भवन उभारणीतही त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार समाजाला समर्पित असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या गौरवाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# २० मे रोजी औषधी विक्रेत्यांचा बंद

**ऑनलाइन औषध विक्री व कॉर्पोरेट स्पर्धेविरोधात संघटनेचा निर्णय**

प्रतिनिधी १२ मे

**आर्णी :** ऑनलाइन औषध विक्री तसेच कॉर्पोरेट कंपन्यांकडून होत असलेल्या अव्यवसायिक स्पर्धेच्या विरोधात अखिल भारतीय औषधी विक्रेता संघाने २० मे रोजी देशव्यापी बंदची हाक दिली आहे. त्यामुळे त्या दिवशी सर्व औषधी दुकाने बंद राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

लोकशाही मार्गाने वारंवार मागण्या करूनही सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, ड्रग्स अँड कॉस्मेटिक्स कायद्यात ऑनलाइन औषध विक्रीसंदर्भात स्पष्ट तरतूद नाही. केंद्र सरकारने इंटरनेटद्वारे औषध विक्रीबाबत नोटिफिकेशन जारी केले असले तरी त्याचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नाही. तरीदेखील देशात मोठ्या प्रमाणात ऑनलाइन औषध विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून न्यायालयाने ऑनलाइन औषध विक्रीवर स्थगिती दिली असतानाही सरकारकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. ही माहिती आर्णी तालुका केमिस्ट संघटनेचे अध्यक्ष संदीप अंदुरे यांनी दिली.

५
सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. १२ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# वेंकटगिरी येथे हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका प्रवेशाबाबत सूचना

**अमरावती:** केंद्र शासनाच्या भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेत सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रासाठी तीन वर्षीय (सहा सत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील पात्र उमेदवारांकडून १० जून २०२६ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. महाराष्ट्र राज्यासाठी ओडिशा राज्यातील बरगढ येथील भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेत १३३१ जागा उपलब्ध असून, आंध्र प्रदेशातील वेंकटगिरी येथील संस्थेसाठी २ जागा काउन्सिलिंग प्रक्रियेद्वारे भरण्यात येणार आहेत. या प्रवेश प्रक्रियेसाठी इच्छुक उमेदवारांनी आपले परिपूर्ण अर्ज प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर, सोलापूर, मुंबई व औरंगाबाद कार्यालयामार्फत सादर करावेत.

# भारताचा प्राचीन ज्ञानवारसा आता डिजिटल स्वरूपात

## ◆ विभागीय आयुक्तांकडून नागरिकांना सहभागाचे आवाहन

प्रतिनिधी १२ मे

**अमरावती:** भारताचा समृद्ध आणि मौल्यवान हस्तलिखितांचा वारसा जतन करण्यासाठी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने 'ज्ञानभारतम्' ही महत्त्वाकांक्षी मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत देशभरातून एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून या महत्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च पासून सुरुवात झाली आहे. या मोहिमेत अमरावती विभागातील नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

भारताला हस्तलिखितांचा मोठा वारसा लाभलेला आहे. ही हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात आहेत. हे सर्व ज्ञानभंडार एकत्र करून एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अंतर्गत हस्तलिखितांचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार केला जाणार आहे. यात हस्तलिखितांचा 'राष्ट्रीय डिजिटल संग्रह' (National Digital Repository) तयार करण्यात येणार असून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करुन दिला जाणार आहे. या प्रक्रियेत हस्तलिखितांची मालकी ही मूळ संस्था, ग्रंथालय किंवा खासगी संग्राहक यांच्याकडेच राहणार आहे. मात्र, स्वखुशीने ही हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करायची असल्यास शासन स्विकारणार आहे.



या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान आदींच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जाणार आहे. प्रकल्पासाठी राज्याची नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालयाची नियुक्ती करण्यात आली असून कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ नागपूरला क्लस्टर केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहे. या केंद्राचे डॉ. राजेंद्र जैन (मो.९३७२०७१२९२) यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

या सर्वेक्षणासाठी 'ग्यान भारतम्' (Gyan Bharatam) हे विशेष मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. त्याद्वारे हस्तलिखितांचे मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरण केले जाणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने अमरावती विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांच्याव्दारे संबंधित जिल्ह्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी यांची ज्ञानभारतम प्रकल्प जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित जिल्हा नोडल अधिकारी आणि जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून विविध मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खासगी संग्राहकांना या मोहिमेत जोडून घेतले जात आहे. या मोहिमेत विद्यार्थी, संशोधक, पारंपरिक पंडित, एनसीसी आणि एनएसएसच्या स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग राहणार आहे.

ज्ञानभारतम् मोहिमेकरीता जिल्हानिहाय नेमणूक केलेल्या नागपूरच्या दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे अधिकाऱ्यांची यादी व संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे : अमरावती व अकोला जिल्ह्याकरीता श्री. दीपक पाटील (मो.९४२३१०२०५१) व डॉ. प्रशांत सोनवणे (मो.८६००७५१८९७), वाशिम जिल्ह्यासाठी श्री. गजानन शेळके (मो.७७६७८०२२६३) व श्याम बोरकर (मो.९४०५५००८१२), बुलडाणाकरीता गजानन शेळके व डॉ. प्रशांत सोनवणे तर यवतमाळ जिल्ह्यासाठी श्रीमती गीता सानगरवार (मो.९३७०१५०९११) व श्याम बोरकर आदी अधिकारी समन्वयक म्हणून काम पाहतील.

# जिल्ह्यातील तलाव/ जलाशयांच्या ठिकाणी वारंवार होणारे अपघाती मृत्यू रोखण्यासाठी सूचना फलक लावा

प्रतिनिधी १२ मे



**अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील विविध तलाव, बंधारे व खोल पाण्याच्या ठिकाणी पोहण्यासाठी किंवा इतर कारणांनी गेलेल्या नागरिकांचे, विशेषतः लहान मुलांचे व तरुणांचे, पाण्यात बुडून मृत्यू होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

या घटनांचे प्रमुख कारण म्हणजे अशा धोकादायक ठिकाणी खोली दर्शविणारे, ठपोहण्यास मनाई आहेठ, ठधोक्याची जागाठ अशा प्रकारचे सूचना फलक लावलेले नाहीत. तसेच सुरक्षारक्षक, दोरखंड, लाईफ जॅकेट, टायर ट्यूब यांसारखी आपत्कालीन साधनेही उपलब्ध नाहीत. माहितीअभावी अनेक निष्पाप जीव बळी पडत आहेत.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, सदर गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन खालील उपाययोजना कराव्यात: - ङसूचना फलक लावणेङ: जिल्ह्यातील सर्व तलाव, बंधारे, नदीघाट व धोकादायक जलाशयांजवळ मराठी भाषेत मोठ्या अक्षरात ठखोल पाणी - धोकाठ, ठपोहण्यास सक्त मनाई आहेठ, ठप्रवेश निषिद्धठ असे फलक लावण्यात यावेत.

- धोक्याची पातळी दर्शविणेङ: पाण्याच्या खोलीची माहिती देणारे खांब/पट्टे बसवावेत. - आपत्कालीन व्यवस्था: प्रमुख पर्यटनस्थळी व अपघातप्रवण ठिकाणी दोरखंड, टायर, लाईफ जॅकेट व प्रथमोपचार पेटी ठेवावी. स्थानिक स्वयंसेवक/जीवरक्षक नेमावेत.

- जनजागृती: शाळा-महाविद्यालयांमधून व ग्रामपंचायतींमार्फत पाण्याच्या धोक्याबाबत जनजागृती मोहीम राबवावी.

- बॅरिकेडिंग: अतिधोकादायक ठिकाणी तारेचे कुंपण किंवा बॅरिकेड्स उभारावेत. वरील उपाययोजना तात्काळ राबविल्यास भविष्यात होणारे अपघाती मृत्यू टाळता येतील व अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्यापासून वाचतील. तरी आपण या निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, ही नम्र विनंति पखासदार बळवंत वानखडे, खासदार डॉ अनिल जी बोंडे, आमदार संजयजी खोडके, आमदार सुलभाताई खोडके यांना प्रवीण हरमकर शिवसेना शहर प्रमुख अमरावती माजी विरोधी पक्षनेता महानगरपालिका नगरसेवक अमरावती यांनी केले.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानात पीक प्रात्यक्षिके, बियाणे मिनी कीट वितरणासाठी अर्ज करावेत

## कृषि विभागाचे आवाहन

प्रतिनिधी १२ मे

**अमरावती:** 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान' तसेच 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' अंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील शेतकरी, शेतकरी गट आणि कंपन्यांना ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेत सहभागासाठी पीक प्रात्यक्षिकात अन्नधान्य व वाणिज्यिक पिके, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी आणि कृषि क्षेत्रातील सहकारी संस्था, शेतकरी गटाची नोंदणी ३१ मार्च २०२४ पूर्वीची असावी. यात महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणाऱ्यांना 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वावर निवडले जाणार आहे. एका गावातून एकाच शेतकरी गटाची निवड होईल. गटातील जास्तीत जास्त २५ शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. मात्र एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला याचा लाभ घेता येईल.

योजनेच्या लाभासाठी सर्व शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅकवर नोंदणी असणे बंधनकारक आहे. कडधान्य आत्मनिर्भरता अभियानात बियाणे मिनीकीट वितरणामध्ये प्रमाणित बियाणे संच (मिनीकीट) वितरणासाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे अर्ज स्वीकारले जात आहेत. यातही प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे.

इच्छुक लाभार्थ्यांनी राज्य शासनाचे पोर्टल mahadtb.maharashtra.goved.in वर जाऊन अर्ज सादर करावेत. पीक प्रात्यक्षिकांसाठी १० एप्रिल २०२६ पासून पोर्टलवर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

# विभागीय लोकशाही दिनी दाखल प्रकरणे निकाली काढा : विभागीय आयुक्त नयना गुंडे

प्रतिनिधी १२ मे

**अमरावती:** विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करणे तसेच संबंधित अर्जदारास केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करणे आवश्यक आहे. यानुसार प्रत्येक विभागाने त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणांच्या संदर्भात प्रत्यक्ष स्थळ पाहणी, चौकशी अहवाल आदींची पडताळणी करुन प्रकरणांचा निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी संबंधित विभागप्रमुखांना आज दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १४ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.



विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात श्रीमती गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज आज पार पडले. यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, गिता वंजारी यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी प्रत्यक्षरित्या तर पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित होते.

यावेळी विभागीय लोकशाही दिनात अमरावती विभागातून दाखल एकूण १४ प्रकरणांवर चर्चा करुन प्रत्येक तक्रारींच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेण्यात आला. एकूण १४ प्रकरणापैकी ४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. २ प्रकरणे नव्याने दाखल झालीत. १२ प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. विभागीय महिला लोकशाही दिनांतर्गत एकही प्रकरण दाखल झाली नाही, अशी माहिती महिला व बालविकास विभागाव्दारे देण्यात आली.

यावेळी लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना श्रीमती गुंडे यांनी यावेळी दिल्या.

# शहरातील वाहतूक व्यवस्थेबाबत युवा स्वाभिमान पक्षाचे पोलीस आयुक्तांना निवेदन

प्रतिनिधी १२ मे

**अमरावती :** अमरावती शहरामध्ये दिवसेंदिवस वाहतुकीची समस्या गंभीर होत चालली आहे. मुख्य चौक, बाजारपेठ, शाळा परिसर तसेच प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

अनेक ठिकाणी रस्त्यांवर अवैधरित्या वाहन पार्किंग, तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. उदा. राजकमल अ?टो चालक, इरविन चौक, राजापेठ बसस्टेंट, चित्रा चौक, चौधरी चौक बडनेरा रोड गोपाल नगर चौक

तसेच काही चौकांमध्ये वाहतूक पोलिसांची अपुरी व्यवस्था असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शाळा व महाविद्यालय परिसरात सकाळी सकाळी व सायंकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते.



तरी आपणास विनंती आहे की, शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक पोलिसांची संख्या वाढविण्यात यावी, अवैध पार्किंग बंद करण्यात यावी तसेच वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ करण्यात याव्यात.

उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, शिक्षण सभापती ॲड. सौ.प्रिती हर्षल रेवणे, नगरसेवक किशोर जाधव, श्रीमती सुमती ढोके, नगरसेवक .अजय मदनमोहन जयस्वाल, नगरसेवक .दिपक किसनलाल साहु, नगरसेवक श्रीमती नंदा धनंजय सावदे, नगरसेवक सौ.रजनी राजेश डोंगरे, नगरसेवक सौ.गौरी शैलेंद्र मेघवानी, नगरसेवक श्री.महेश धनराज मुलचंदानी, नगरसेवक श्री.योगेश रघुनाथ विजयकर, नगरसेवक सौ.अर्चना अशोक पांडे, नगरसेवक सौ.प्रियंका भुषण पाटणे, नगरसेवक श्रीमती मिराताई कांबळे, नगरसेवक सौ.मधुरा मिलींद कहाळे, अवि काळे, श्रीकांत इंगळे, नितीन बोरेकर, मिलींद कहाळे, शुभम उंबरकर, संदीप कांबळे, शैलेंद्र मेघवानी यांची उपस्थिती होती.

## संमिश्र

# आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी १२ मे

**अकोट :** अकोट तालुक्यातील आदर्श ग्राम सावरा येथील रहिवासी राजेंद्र माधवराव राऊत ग्रामपंचायत अधिकारी करतवाडी धनक वाडी कवठा यांच्या प्रामाणिक सेवेबद्दल व ग्रामीण विकासाबद्दल त्यांना दिनांक ११/५/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता अकोला येथील जिल्हा परिषद विश्रामगृहामध्ये अनिताताई मेश्राम मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांच्या हस्ते आदर्श ग्रामसेवक म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे श्री राऊत यांचे अकोट तालुक्यातील ग्रामसेवक म्हणून पुरस्कारा करता निवड झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत



आहे त्यांनी यापूर्वी कालवाडी तालुका अकोट येथे पण आदर्श ग्राम कालवाडी म्हणून राज्यस्तरावर पुरस्कार प्राप्त झाला होता तसेच त्यांनी कालवाडी वडाळी देशमुख या गावांचा कारभार पाहिला तसेच ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या अडचणी व गावातील विकास कामावर सातत्याने भरलेला विशेषतः त्यांचा अकोट पंचायत समितीमध्ये प्रामाणिक ग्रामसेवक म्हणून ते परिचित आहेत . ग्रामीण भागातील घरकुल रस्ते पाणी आधी सह इतर कामात प्रकाशाने ग्रामविकासाची पाऊलवाट ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या माध्यमातून चालू ठेवली सदर पुरस्काराबद्दल त्यांचं सर्वत्र कौतुक होत आहे.

# ज्ञानभारतम् राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

## ◆ जिल्हाधिकाऱ्यांचे नागरिकांना सहभागाचे आवाहन

प्रतिनिधी १२ मे

**अमरावती:** भारताचा समृद्ध आणि मौल्यवान हस्तलिखित वारसा जतन करण्यासाठी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी मोहिम राबविण्यात येत आहे. या योजनेत देशभरातून एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील नागरिकांनी सहभाग नोंदवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

भारताला हस्तलिखितांचा मोठा वारसा लाभलेला आहे. ही हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात आहेत. हे सर्व ज्ञानभंडार एकत्र करून एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अंतर्गत हस्तलिखितांचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार केला जाणार आहे. यात हस्तलिखितांचा 'राष्ट्रीय डिजिटल संग्रह' तयार करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत हस्तलिखितांची मालकी ही मूळ संस्था, ग्रंथालय किंवा खासगी संग्राहक यांच्याकडेच राहणार आहे. मात्र, स्वखुशीने ही हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करायची असल्यास शासन स्विकारणार आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यात विविध सांस्कृतिक संस्था व विद्यापीठांच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जात आहे. प्रकल्पासाठी राज्याची नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालयाची नियुक्ती करण्यात आली आहे.

या सर्वेक्षणासाठी ग्यान भारतम् हे विशेष मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. त्याद्वारे हस्तलिखितांचे मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरण केले जाणार आहे. जिल्हा स्तरावर देखील जिल्हा नोडल अधिकारी आणि जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून विविध मंदिरे, मठ, शैक्षणिक संस्था व खासगी संग्राहकांना या मोहिमेत जोडून घेतले जात आहे. या मोहिमेत विद्यार्थी, संशोधक, पारंपरिक पंडित, एनसीसी आणि एनएसएसच्या स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग राहणार आहे.

नागरिकांकडे अथवा संस्था, मंदिरे, ग्रंथालये किंवा खासगी संग्रहात जुनी हस्तलिखिते उपलब्ध असल्यास, त्याची माहिती ग्यान भारतम् या मोबाईल ॲपवर अपलोड करावीत. या अमूल्य ज्ञानवारशाचे जतन करण्याच्या कार्यात नागरिक, संस्था आणि संशोधकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# चर्मकार समाजातील डॉक्टरांचा अकोल्यात भव्य सत्कार सोहळा

प्रतिनिधी १२ मे

**अकोला :** शहरातील रहिवासी असलेले चर्मकार समाजातील डॉक्टर जे अकोल्यात व इतरत्र वैद्यकीय सेवा देतात तसेच इतरत्र ठिकाणचे रहिवासी असलेले अकोल्यात सेवा देतात अशा डॉक्टरांचा गौरव करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक विचार मंच, अकोलाच्या वतीने ङ्डॉक्टर्स सन्मान-सत्कार सोहळा २०२६ङ्क चे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, ७ जून रोजी सकाळी ९.३० वाजता प्रमिलाताई ओक सभागृहात होणार आहे.?

या कार्यक्रमात ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, दंतचिकित्सा तसेच फिजिओथेरपी अशा विविध वैद्यकीय शाखांमध्ये कार्यरत असलेल्या नोंदणीकृत डॉक्टरांचा सन्मान करण्यात येणार आहे. वैद्यकीय व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार असून, समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या डॉक्टरांच्या योगदानाचा गौरव करण्याचा आयोजकांचा मानस आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी डॉक्टरांची माहिती समाजबांधवांनी २५ मे २०२६ पर्यंत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन आयोजक मंडळाने केले आहे. समाजबांधवांनी रामभाऊ ताजने(८३९०७४५०८२), प्रा. गजानन पदमणे (९४२२९६०३०३), मधुसूदन गव्हाळे (९७६४७७३३६३), प्रभाकर रेवस्कर (९४२०८३९५९४), गजानन काकडे (९४०४८४८८५) या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. या स्तुत्य उपक्रमाला सर्वांनी सहकार्य करून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ज्येष्ठ नागरिक विचार मंच, अकोला यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि १२ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

*वाशीम शहरात मोकाट श्वानांचा हैदोस


*लहान मुलांना चावण्याच्या घटनांमध्ये वाढ

*श्वान बंदोबस्त करण्याची नागरिकांची मागणी

*नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिकांत संताप

### वाशीम नगरपालिकेकडून...

# मोकाट श्वानांची नसबंदी, ठरली भ्रष्टाचाराची संधी!



## श्वानांच्या नसबंदीत लाखोंचा भ्रष्टाचार ; अधिकारी पैशासाठी लाचार

### संबंधित अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी

वाशीम नगरपालिकेच्या वतीने शहरातील मोकाट श्वानांची नसबंदी करण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. या कामासाठी नांदेड येथील एका कंपनीला ठेका देण्यात आला आहे. संबंधित कंपनीकडून तब्बल ६०० हून अधिक श्वानांची नसबंदी,लसीकरण केल्याचे दाखविण्यात आले आहे. एका श्वानामागे सुमारे १६०० रुपयेहुन अधिक खर्च दाखविण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.मात्र प्रत्यक्षात शहरातील परिस्थिती वेगळीच असल्याचे दिसून येत आहे. शहरात आजही मोठ्या प्रमाणात मोकाट श्वानांचा वावर दिसून येत असून त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे. अनेक भागांमध्ये एकाही श्वानाची नसबंदी झाल्याचे दिसून येत नसल्याने ही संपूर्ण मोहीम केवळ कागदावरच राबविण्यात आली की काय, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.या मोहिमेत मोकाट श्वानांच्या नसबंदीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप शहरवासीयांकडून करण्यात येत आहे. तसेच या कामाची सखोल चौकशी करून लाखो रुपये खर्च दाखविणाऱ्या आणि स्वतः साठी 'हिरें' चा 'मठ' तयार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे.

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम शहरात मोकाट श्वानांचा वाढता त्रास नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असून लहान मुलांसह ,महिला आणि नागरिकांवर श्वान हल्ल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. दुसरीकडे नगरपालिकेने शेकडो श्वानांना पकडून नसबंदी केल्याचा दावा केला आहे. यावर लाखो रुपयांचा खर्च दाखवला असला तरी मात्र प्रत्यक्षात शहरात नसबंदी झाल्याचे चित्र दिसत नाही. त्यामुळे श्वानांच्या या संपूर्ण मोहिमेवरच संशय व्यक्त केला जात आहे. तसेच ज्या संबंधित अधिकाऱ्याकडे श्वानांचे कामकाज दिले होते. त्यानी देखील न.प.चे लाखो रुपये खर्च दाखवत स्वतःसाठी 'हिरें' चा 'मठ' तयार केल्याचा आरोप नागरिकांमधून केला जात आहे.







वाशीम शहरात सध्या मोकाट श्वानांचा हैदोस वाढताना दिसत असून लहान मुलांसह नागरिकांवर श्वानांनी हल्ला करण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. शहरातील विविध भागांतून श्वान चावण्याच्या घटना सातत्याने समोर येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.विशेषतः सकाळी किंवा सायंकाळी खेळणारी लहान मुले तसेच कामानिमित्त बाहेर पडणारे नागरिक यांना मोकाट श्वानांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांत शहरातील काही भागांमध्ये लहान मुलांना श्वानांनी चावल्याच्या घटना घडल्या असून संबंधित मुलांना रुग्णालयात उपचार घ्यावे लागले आहेत.शहरातील मुख्य रस्ते, वसाहती, बाजारपेठा, तसेच बसस्थानक परिसरात मोकाट श्वानांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांवर भुंकत पाठलाग करणे आणि एकत्रित टोळक्याने हल्ला करण्याच्या घटनांमुळे अपघातांचाही धोका निर्माण झाला आहे.या गंभीर परिस्थितीकडे वाशीम नगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. मोकाट श्वान पकड मोहीम, नसबंदी आणि लसीकरण ही मोहीम केवळ कागदावरच होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.त्यामुळे मूख्याधिकारी यांनी श्वानांच्या वाढत्या घटनांवर गांभीर्याने लक्ष देवून योग्य ते उपाय योजना कराव्या अशी मागणी शहरवासीयांमधून होत आहे.

## थोडक्यात

### राष्ट्रीय बंजारा परिषदेचे अधिवेशन संपन्न

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●



भाजप तांडा वस्ती संपर्क अभियंन प्रदेश अध्यक्ष तसेच राष्ट्रीय बंजारा परिषद चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मोहन चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नांदेड नगरीत पार पडले त्या निमित्ताने राष्ट्रीय परिवहन मंत्री श्री नितीन गडकरी व राज्याचे मंत्री श्री देवेंद्र फडणवीसांनी डॉ मोहन चव्हाण यांच्या समाज कार्य चा पुढाकार पाहुण शुभेच्छा दिल्या त्या अधिवेशन मध्ये मा. राष्ट्रीय अध्यक्ष भगवंत सेवक किशन भाऊ राठोड मा.राष्ट्रीय बंजारा परिषद चे विलास भाऊ राठोड व बंजारा समाजाचे आराध्य दैवत मंहत बाबुसिंग महाराज. मंहत जितेंद्र महाराज समातील सन्मानित व्यक्ती यांनी चव्हाण साहेब यांच्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या यावेळी मान्यवरांनी सांगितले की डॉक्टर मोहन चव्हाण यांच्या राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून समाजामध्ये उल्लेखनीय कार्य केले असून बंजारा समाजाच्या शैक्षणिक सामाजिक व संघटनात्मक विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत त्यांच्या नेतृत्वामुळे समाजात जनजागृती निर्माण झाली असून युवकांना नवी दिशा मिळत आहे वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी यांचा सत्कार केला.

### लोक अदालतीत एकाच दिवशी ४३२ प्रकरणांचा निपटारा

#### तब्बल ३.८६ कोटींची प्रकरणे निकाली



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार शनिवार, दि. ९ मे २०२६ रोजी जिल्हा न्यायालयासह जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

लोक अदालतीचे उद्घाटन उपस्थित पक्षकारांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष अनिल सुब्रमण्यन, जिल्हा न्यायाधीश-१ जे. पी. झपाटे तसेच जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष अनुप बाकलीवाल उपस्थित होते. राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एका दिवसात जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली ३ हजार ६०३ प्रकरणे तसेच दाखलपूर्व ३ हजार ९०२ प्रकरणे विचारार्थ ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४२६ प्रलंबित प्रकरणे आणि ६ दाखलपूर्व प्रकरणे अशा एकूण ४३२ प्रकरणांचा यशस्वी निपटारा करण्यात आला.या लोक अदालतीत तब्बल ३ कोटी ८६ लक्ष ९६ हजार ५१८ रुपयांच्या प्रकरणांवर तडजोडीने तोडगा काढण्यात आला.राष्ट्रीय लोक अदालत यशस्वी होण्यासाठी वकील संघ तसेच जिल्हा पोलीस दलाचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने कळविले आहे.

### जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**वाशीम:** जिल्ह्यात २२ मे २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल.

## अवैध गुटखा, कारवाईचा चटका !

### *समृद्धी महामार्गावर १ कोटी ३१ लाख रुपयेचा गुटखा जप्त *महामार्ग पोलिसांची धडक कारवाई

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●



समृद्धी महामार्गावर महामार्ग पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी ३१ लाख ५१ हजार २५० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूचा मुद्देमाल जप्त केला.या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.९ मे. रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास समृद्धी महामार्गावरील कारंजा (लाड) टोल नाका येथे महामार्ग पोलिसांकडून वाहन तपासणी सुरू होती. यावेळी महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग नागपूरचे पोलीस अधीक्षक यशवंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक कृष्ण कन्हैया पवार व पोलीस अंमलदार यांनी संशयित आयशर वाहन क्र.एम.एच ४० सी.टी.२९६४ थांबवून तपासणी केली. वाहनातून गोडसर वास येत असल्याने चालकाकडे चौकशी करण्यात आली.त्यावेळी वाहनामध्ये तंबाखूसदृश्य पदार्थ असून तो अमरावती येथील जावेद नामक व्यक्तीचा असल्याचे चालकाने सांगितले.

त्यानंतर पोलिस उपनिरिक्षक कृष्ण कन्हैया पवार यांनी तात्काळ ही माहिती महामार्ग पोलीस विभाग वाशिमचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीनकुमार दांदडे यांना दिली. दांदडे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन सदर वाहन कारंजा शहर पोलीस ठाण्यात ताब्यात ठेवले. तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाला पाचारण करण्यात आले. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तपासणीत वाहनातील माल हा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू असल्याचे निष्पन्न झाले.यानंतर पोलिस उपनिरीक्षक कृष्ण कन्हैया पवार यांच्या फिर्यादीवरून कारंजा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक यशवंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक नितीनकुमार दांदडे पोलिस उपनिरीक्षक कृष्णकन्हैया पवार,पोलीस हेड कॉन्स्टेबल अमोल इंगोले व पोलीस कॉन्स्टेबल आनंद काकडे यांनी पार पाडली.

## कवठा येथे बालविवाह रोखला

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●




रिसोड तालुक्यातील कवठा (चिखली) येथील अल्पवयीन मुलीचा विवाह दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सातारकर महाराज संस्थान, रिसोड येथे आयोजित करण्यात आला होता. याबाबतची माहिती चाईल्ड हेल्पलाईन १०९८, वाशिम यांना मिळताच पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विवाह सोहळा थांबवत मुलीची कागदपत्रे तपासली असता तिचे वय १५ वर्षे ५ महिने असल्याचे निष्पन्न झाले. कायदेशीर विवाहासाठी आवश्यक वयोमर्यादेपेक्षा ते कमी असल्याने ही कारवाई करण्यात आली.

यानंतर मुलीचे पालक, विवाहासाठी मध्यस्थी करणारे व संबंधित व्यक्तींविरोधात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कलम ९, १० व ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. संबंधितांना कायदेशीर नोटीसही बजावण्यात आली आहे.या कारवाईत चाईल्ड हेल्पलाईनचे सदस्य अमोल देशपांडे, सुजात खान, प्रतिभा घनसावंत, निलिमा भोंगाडे, मुख्यसेविका शुभांगी शिंदे, अंगणवाडी सेविका आम्रपाली पठाडे तसेच रिसोड पोलीस स्टेशनचे कर्मचारी कांचन डोंगरदिवे व राजेश गांगवे यांनी सहभाग घेतला. संबंधितांचे समुपदेशन करून बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत माहिती देण्यात आली.

## जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी ७४.३९ लाखांच्या उपाययोजनांना मंजुरी

### ३६ रिचार्ज शाफ्ट व ट्रेंच कामांद्वारे भूजल पुनर्भरणाला चालना

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता सन २०२५-२६ च्या पाणी टंचाई कृती आराखड्यांतर्गत विविध गावांमध्ये स्त्रोत बळकटीकरणासाठी रिचार्ज शाफ्ट व रिचार्ज ट्रेंच या उपाययोजनांच्या कामांना अटी व शर्तीच्या आधिन जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मंजुरी दिली आहे. या कामांसाठी एकूण ७४ लाख ३९ हजार ६८८ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून जिल्ह्यातील १२ गावांमध्ये ३६ उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

भूजल पातळीत सातत्याने होत असलेली घट आणि उन्हाळ्यात निर्माण होणारी पाणी टंचाई लक्षात घेऊन भूजल सर्वेक्षण आणि



विकास यंत्रणा, वाशिम यांच्या माध्यमातून हा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ही कामे दीर्घकालीन जलसंधारणाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार असून ग्रामीण भागातील नागरिकांना त्याचा थेट लाभ होणार आहे. तसेच पाणी टंचाईग्रस्त भागांमध्ये शाश्वत जलव्यवस्थापनासाठी अशा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.

## पुंडलिक नगर देगाव येथे रोगनिदान शिबिर

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

रिसोड येथून जवळच असलेल्या पुंडलिक नगर देगाव येथे महिला उत्कर्ष प्रतिष्ठान व आयुर्वेद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व आयुर्वेद पंचकर्म शिबिर आयोजित करण्यात आले .

पहिल्याच दिवशी ९१६ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली त्यामध्ये डोळ्याचे आजार असणाऱ्या रुग्णांना तपासणीनंतर मोफत चष्मे वाटप,ड्रॉप व गोळ्या औषधी यांचे मोफत वाटप करण्यात आले तसेच आयुर्वेद पंचकर्म शिबिराला सुद्धा रुग्णांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला ज्या रक्ताच्या तपासण्या बाहेर केल्या नंतर जवळपास ५००० रुपये खर्च येतो अशा सर्व तपासण्या मोफत





करण्यात आल्या तसेच त्वचारोग तपासणी,स्त्री रोग तपासणी त्यामध्ये गर्भाशयाचे आजार,पोटाच्या विकाराची तपासणी हृदयरोग तपासणी या सर्व तपासण्या मोफत करण्यात आल्या.या शिबिरामध्ये आज आदरणीय आमदार भावनाताई गवळी,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अनिल कावरखे डॉ.कड आयुर्वेद महाविद्यालयातील सर्व डॉक्टर्स उपस्थित होते त्या बरोबर जिल्हा शिवसेना सचिव नागेश घोपे,जिल्हा संघटक अनिल गरकल, शिवसेना ओबीसी सेल चे जिल्हा प्रमुख विजय बोरकर,शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा प्रमुख सावके सर, जिल्हा उपप्रमुख नंदुभाऊ देशमुख, तालूका प्रमुख मच्छिंद्र पाटील ढोणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती ॲड. गजानन अवताडे, संचालक गजानन पाचरने,नगर परिषद उपाध्यक्ष विष्णू कदम,सभापती संतोष चऱ्हाटे, नगरसेवक विजय जाधव, भारत भगत, माजी नगराध्यक्ष विजय तुरूंकमाणे, गजानन निखाते, माजी नगरसेवक फय्याज भाई, सैयद अकील भाई शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे तालुका प्रमुख डॉ. प्रल्हाद कोकाटे ,गजानन गव्हाणे, शिवसेना शहर प्रमुख अरुण मगर,युवा सेना शहर प्रमुख कपिल कदम,शहर उपप्रमुख अतुल पाटील पवार गजानन बोन्डे यांच्यासह मोठ्या प्रमाणावर शिवसैनिक उपस्थित होते,शिबिर यशस्वी करण्यासाठी आयुर्वेद महाविद्यालयातील सर्व कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले शिबिर १५ तारखेपर्यंत असेच मोफत राहणार असून या शिबिराचा मोठ्या प्रमाणावर रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवहन आ.भावनाताई गवळी यांनी केले आहे.

# शहराच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द !

### *नगराध्यक्ष अनिल केंदळे यांचे प्रतिपादन * विविध विकास कामांचा शुभारंभ

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम शहराच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी शहरातील प्रभाग क्रमांक १३ मध्ये आयोजित विविध विकास कामांच्या भूमीपूजन कार्यक्रमात केले. यावेळी नगरसेवक राजुभाऊ वानखेडे, योगाचार्य वानखेडे, निकुज देव्याणी, आशिष वर्मा, अतुल तुपसांडे, व्यवहारे हे उपस्थित होते.



नागरिकांच्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांना अखेर सुरुवात झाली. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत पालकमंत्री दत्तामामा भरणे यांच्या निधीतून विकासकामांमुळे परिसराच्या सौंदर्यात आणि सुविधांमध्ये मोठी भर पडणार आहे. त्यामुळे राजकारणातून समाजसेवा करणाऱ्या राजुभाऊ वानखेडे यांनी एकाच ध्यास धरला असून वार्डासह शहराचा विकास करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या अंतर्गत शिवालय मंदिर ते शिवजल परिसरापर्यंत नवीन नाली बांधकाम तसेच विठ्ठल मंदिर ते बाल समुद्र मंदिरापर्यंत नाली बांधकामाचे भूमीपूजन करण्यात आले. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेऊन हाती घेतलेल्या या कामांमुळे पावसाळ्यातील पाणी साचण्याची समस्या कमी होऊन परिसर अधिक स्वच्छ आणि सुस्थितीत राहण्यास मदत होणार आहे.या विकासकामांचे भूमिपूजन अनिल भाऊ केंदळे, नगराध्यक्ष वाशिम यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती होती. यामध्ये राजुभाऊ विठोबा भांदगे, राहुलभाऊ मोतीरामजी तुपसांडे तसेच शे. खाजाबी सुर हे उपस्थित होते. दिनांक ११ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विठ्ठल मंदिराजवळ हा सोहळा पार पडला. परिसरात यानिमित्त उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विकासकामांच्या माध्यमातून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात येत आहे.



राजूभाऊचे 'राज' कारण नव्हे; समाजकारण, कोट्यावधीच्या विकास कामाचे धोरण !

नगर 'सेवक' नव्हे ; खरा जन 'सेवक'..

सिटी न्युज ब्युरो @ वाशीम

सोमवार दि ११ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राजुभाऊंचा एकच ध्यास, वार्डासह शहराचा विकास !

विविध विकास कामाचा भूमीपूजन सोहळा

सिटी न्युज ब्युरो @ वाशीम

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
मंगळवार, दि. १२ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# चारचाकीची दुचाकीला धडक; पिता-पुत्र जखमी

**डोणगाव :** आरेगाव रोडवरील सारडा किराणा दुकानासमोर भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने पिता-पुत्र जखमी झाल्याची घटना घडली. या प्रकरणी डोणगाव पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरेगाव (ता. मेहकर) येथील सुधीर बबनराव टाले व त्यांचा मुलगा विवेक टाले हे ९ मे रोजी रात्री दुचाकीने डोणगावहून आरेगावकडे जात होते. रात्री ८.५७ वाजता सारडा किराणा दुकानाजवळ समोरून आलेल्या पांढऱ्या रंगाच्या भरधाव स्कॉर्पिओने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात दोघेही जखमी झाले. पवन महादेवराव टाले यांच्या फिर्यादीवरून डोणगाव पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनात डोणगाव पोलिस ठाण्यातील अरुण सानप तपास करीत आहेत.

# 45 बंब रिचवल्यानंतर डम्पिंग ग्राऊंडवरील आगीवर नियंत्रण

## खामगावात कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी १२ मे

**खामगाव :** शहरातील डम्पिंग ग्राऊंडला रविवारी दुपारी लागलेल्या भीषण आगीने शहराला धुराच्या विळख्यात घेतले. तब्बल ४५ बंब पाण्याचा मारा, रात्रभर सुरू असलेले शर्थीचे प्रयत्न व सोमवारी सकाळपर्यंत सुरू असलेली धग यानंतर अखेर अग्निशामक दलाला आग आटोक्यात आणण्यात यश आले.

शहरातील स्थानिक डम्पिंग ग्राऊंड परिसरात रविवारी (दि. १०) दुपारी अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. गेल्या तीन वर्षांपासून साचून राहिलेल्या कचऱ्याने काही क्षणांत पेट घेतल्याने आगीने विक्राळ स्वरूप धारण केले. सुरुवातीला छोट्या प्रमाणात दिसणारी आग काही वेळातच संपूर्ण डम्पिंग परिसरात पसरली आणि आकाशात धुराचे मोठे लोट उठू लागले. या घटनेची माहिती मिळताच नगरपालिका अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. आग नियंत्रणासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू करण्यात आले. मात्र, कचऱ्याचे मोठे ढीग, प्लास्टिक व ज्वलनशील पदार्थांमुळे आग नियंत्रणात आणणे कठीण ठरत होते. रात्री उशिरापर्यंत आग धुसमत राहिल्याने सोमवारी सकाळपर्यंत तब्बल ४५ बंब पाण्याचा मारा करण्यात आला. अखेर अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

**आग लागली की लावली?**

खामगावच्या डम्पिंग ग्राऊंडला वारंवार लागणाऱ्या आगीचा प्रश्न यापूर्वीही विधानसभेत गाजला होता. त्यामुळे यावेळी लागलेली आग अपघाती होती की मुद्दाम लावण्यात आली, याबाबत नागरिकांमधून संशय व्यक्त केला जात आहे. प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**आरोग्य धोक्यात!**

१० मे रोजी दुपारी अचानक आग लागली होती. डम्पिंग ग्राऊंडमधून निघणाऱ्या दुर्गंधीयुक्त धुरामुळे शहरातील गोपाळ नगर, शिवाजी वेस, फरशी, एमआयडीसी परिसर, नांदुरा रोड, चांदी कॉलनी तसेच वाडी, सुटाळा खुर्द व बुद्धक परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

# टाकरखेड शिवारात तीन बिबटे; शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण

## वन विभागाने उपाययोजना करण्याची मागणी

प्रतिनिधी १२ मे



**नांदुरा :** तालुक्यातील टाकरखेड शिवारात रविवार, दि.११ मे रोजी एकाचवेळी तीन बिबट्यांचे दर्शन झाल्याने शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

टाकरखेड परिसरात ज्वारी पिकाची सोंगणी सुरू असताना काही मजुरांना दिवसा बिबटे दिसून आले. विशेष म्हणजे, एक-दोन नव्हे तर तब्बल तीन बिबटे एकाचवेळी शिवारात आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. यातील एक बिबट संजय जाधव यांच्या शेतातील झाडावर बाभळीच्या बसलेला असल्याने शेतमजूरांना दिसले, तर अन्य दोन बिबटे गावाच्या दिशेने जाताना अनेकांच्या निदर्शनास आले.

सध्या खरीप हंगाम तोंडावर असल्याने शेतमशागतीच्या कामांना वेग आला आहे. अशा परिस्थितीत बिबट्यांचा वाढता वावर शेतकरी आणि शेतमजुरांसाठी धोकादायक ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे. संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी वन विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.खैरा, कंडारी खुर्द, टाकरखेड, डोलखेड, जवळाबाजार आणि बेलूरा परिसरात गेल्या वर्षभरापासून बिबट्या आणि त्याच्या बछड्यांचा वावर असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. अनेकांना वेगवेगळ्या ठिकाणी दिवसा बिबट्या चे दर्शन झाले असुन पशुपालकांची गुरे, वासरे आणि कुत्र्यांवर हल्ल्याच्या घटनाही घडल्या आहेत. काही दिवसांपूर्वी पिंपळखुटा येथील एका शेतकऱ्यावर बिबट्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली होती. त्यामुळे शेतकरी रात्रीच्या वेळी शेतात पाणी देण्यासाठी जाण्यासही घाबरत असल्याचे चित्र आहे.सहा महिन्यांपूर्वी जवळाबाजार आणि बेलुरा शिवारात दिवसाढवळ्या बिबट्याची बछडे दिसून आली होती. त्यावेळी शेतकऱ्यांनी ती वन विभागाच्या ताब्यात दिली होती. नंतर मोताळा वनपरिक्षेत्र विभागाने ती बछडे पुन्हा परिसरात सोडल्याची माहिती असून, सध्या दिसलेले बिबटे हेच मोठे झाले असावेत, असा अंदाजही वर्तविण्यात येत आहे.नांदुरा, मोताळा आणि मलकापूर तालुक्यातील विविध भागांमध्ये बिबट्यांचा वाढता वावर पाहता वन विभागाने तातडीने बंदोबस्त करून नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी, अशी मागणी शेतकरी आणि ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# वाढदिवसाच्या पार्टीत युवकावर हल्ला; दोघांवर गुन्हा दाखल

## शिरसगाव येथील घटना: किरकोळ कारणावरून वाद

प्रतिनिधी १२ मे

**खामगाव :** शिरसगाव देशमुख येथे वाढदिवसाच्या पार्टीदरम्यान झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर मारहाणीत झाल्याची घटना ९ मे रोजी घडली. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध खामगाव ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या पोलिसांकडून माहितीनुसार, राहुल मनोहर अंत्तमगण (३४, रा. शिरसगाव देशमुख) हे त्यांच्या मित्रांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला गेले होते. ९ मे रोजी रात्री प्रणव विठ्ठल देशमुख याच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पार्टीत मद्यपानाच्या कारणावरून उपस्थितांमध्ये वाद निर्माण झाला. वाद तीव्र झाल्यानंतर आरोपींनी राहुल अंत्तमगण यांच्याशी शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर सूरज निंबेकर याने फिर्यादीला पकडून ठेवले, तर प्रणव देशमुख याने हातातील बीयरची काचेची बाटली राहुल यांच्या उजव्या खांद्यावर मारल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.या घटनेत राहुल अंत्तमगण जखमी झाले असून, आरोपींनी जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही उल्लेख तक्रारीत आहे.या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५२, ३५१ (२) (३) व ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

# टिनपत्रे विकण्यास विरोध केल्याने काकावर काठीने हल्ला; गुन्हा दाखल

## दसरा मैदान परिसरातील घटना; जिवे मारण्याची धमकी दिली!

प्रतिनिधी १२ मे

**शेगाव:** घराच्या दुरुस्तीसाठी काढून ठेवलेली टिनपत्रे भंगारात विकण्यास विरोध केल्याच्या कारणावरून दारूच्या नशेत पुतण्याने काकावर लाकडी काठीने हल्ला करून जखमी केल्याची घटना शहरातील दसरा मैदान परिसरात घडली. याप्रकरणी दि. ११ मे रोजी शेगाव शहर पोलिस ठाण्यात आरोपी पुतण्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हरी रामभाऊ डवले (६४, रा. दसरा मैदान, शेगाव) यांच्या तक्रारीनुसार, ११ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे १० वाजता त्यांचा पुतण्या संतोष देवीदास डवले (वय ३५, रा. डोंगरगाव, ता. बाळापूर, जि. अकोला) हा दारूच्या नशेत त्यांच्या घरी आला होता. फिर्यादीच्या घराचे दुरुस्तीचे काम सुरू असल्याने घरावरील टिनपत्रे काढून खाली ठेवण्यात आली होती. त्यापैकी सहा टिनपत्रे आरोपी संतोष डवले हा भंगारवाल्याला विकत असल्याचे फिर्यादीच्या निदर्शनास आले. याबाबत हटकले असता आरोपीने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यानंतर आरोपीने जवळ पडलेली लाकडी काठी उचलून फिर्यादीला मारहाण केली.

# मिरवणुकीत नाचण्यावरून दोन गटांत हाणामारी; नांदुऱ्यात काही काळ तणाव

## पोलिसांच्या तत्परतेने परिस्थिती नियंत्रणात

प्रतिनिधी १२ मे

**नांदुरा :** शहरातील बुलढाणा रोडवरील सोफीबाग परिसरात रविवारी रात्री मिरवणुकीदरम्यान नाचण्याच्या कारणावरून दोन गटांत वाद होऊन हाणामारी झाली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत सौम्य बळाचा वापर करून परिस्थिती नियंत्रणात आणली. ही घटना रविवारी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास घडली.

रविवारी शहरातून मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणुकीदरम्यान नाचण्यावरून एकाच समाजातील काही तरुणांमध्ये सुरुवातीला वाद निर्माण झाला. उपस्थितांनी मध्यस्थी करत हा वाद त्याचवेळी मिटविला; मात्र काही तरुण तेथून निघून गेल्यानंतर काही वेळाने आपल्या सहकाऱ्यांसह पुन्हा मिरवणुकीत सहभागी झाले.

मिरवणुकीत पूर्वीचा वाद पुन्हा उफाळून आला आणि दोन गटांमध्ये हाणामारी सुरू झाली. त्यामुळे परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. काही युवक तलवार व धारदार हत्यारे घेऊन आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच मोठ्या संख्येने पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. प्रकरण हाताबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेता पोलिसांनी सौम्य बळाचा वापर करत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून परिसरात बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.

# जन्म-मृत्यू नोंदींची प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढा!-तहसीलदार

## तहसीलदारांना निवेदन देताना संग्रामपूर वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य; संग्रामपूर वकील संघाचे तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी १२ मे

**संग्रामपूर:** तहसील कार्यालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमांतर्गत अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने विद्यार्थी व गरजू नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नियमानुसार, दाखल करण्यात आलेली प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, अशी मागणी संग्रामपूर वकील संघाकडून करण्यात आली. यासंदर्भात शुक्रवारी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार, भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आक्षेप घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीनुसार जन्म-मृत्यू नोंदींची प्रकरणे निकाली काढण्याची प्रक्रिया थांबविण्यात आली आहे.त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, विविध शासकीय सुविधांपासून वंचित राहण्याची वेळ येत आहे. वकिलांकडून शासनाच्या निकषानुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही संबंधित प्रकरणांवर कार्यवाही होत नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.निवेदनावर तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. एम. एस. किर्तने, सचिव व्ही. पी. वानखडे, पी. के. घाटे, जी. जी. चिकटे, पी. के. तायडे, टी. ए. बेग, व्ही. एम. बावणे, आर. एस. राऊत, के. पी. बावस्कर, बी. पी. खंडेराव, जी. ए. क्षीरसागर, प्र.न्या. भोंडे, ए. एल. खान आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**नोंदी प्रलंबित, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान!**

जन्म-मृत्यू नोंदींची प्रकरणे प्रलंबित राहिल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालय प्रवेश, शिष्यवृत्ती तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे वकील संघाने निवेदनात म्हटले आहे.

# खतांच्या दरवाढीने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले!

## शेतकरी सेंद्रिय खतांकडे वळण्याच्या तयारीत!

प्रतिनिधी १२ मे



**खामगाव :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी शेतीपूर्व तयारीला सुरुवात केली असतानाच रासायनिक खतांच्या वाढलेल्या दरांमुळे त्यांच्यासमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. २० २०० १३, १० २६ २६ २४ २४ ०, ९ २४ २४, अमोलियम सल्फेट, सुपर फासपेट, आदींसह सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन विस्कळीत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

खरीप हंगामात विशेषतः सोयाबीन व कापूस पिकांसाठी मोठ्या प्रमाणावर खतांचा वापर केला जातो; मात्र यंदा खतांच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. शासनाकडून खतांवर अनुदान दिले जात असले, तरी बाजारातील वाढते दर व इतर शेतीखर्च यामुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण वाढत आहे. दरवाढीमुळे अनेक शेतकरी खतांचा वापर मर्यादित करण्याचा विचार करत असल्याचे सांगितले जात आहे. याचा थेट परिणाम पीक उत्पादनावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेती परवडणारी राहील का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

**रासायनिक खतांच्या दोन बॅगांच्या किमतींत ट्रॉलीभर शेणखत!**

रासायनिक खतांच्या वाढत्या दरांमुळे शेतकरी पर्यायी उपायांकडे वळताना दिसत आहेत. विशेषतः २०:२०:०:१३ या मिश्र खताच्या एका बॅगची किंमत दोन हजार रुपयांपेक्षा अधिक झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दोन बॅगांच्या किमतींत ट्रॉलीभर शेणखत उपलब्ध होत असल्याने यंदा अनेक शेतकऱ्यांनी रासायनिक खतांऐवजी शेणखताचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. वाढत्या उत्पादन खर्चामुळे सेंद्रिय खतांकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असल्याचे चित्र आहे.

# देवधाबा कमर्दीपुर शिवारातील लोंबकळलेल्या तारांमुळे जिवितहानी होण्याची भिती

प्रतिनिधी १२ मे



**मलकापुर:** ग्राम देवधाबा शिवारातील कमर्दीपुर येथील गट नंबर ४० व ४४ या शेतातील दोन पोल मधील अंतर जास्त झाल्याने पोल झुकून विद्युत तारा जमिनीला टेकत आहे सदर तारांमुळे शेतीत मशागत करतांना जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, वारंवार लाईनमन, वायरमन यांना सांगितले तसेच लेखी अर्ज सुद्धा दिले असून म.रा.वि.विसकंपनी याकडे दुर्लक्ष केल्याने याबाबतची माहिती आज शेतकऱ्यांनी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांना सांगितल्याने त्यांनी शेतकऱ्यांसोबत अभियंता शेख यांची भेट घेऊन दोन दिवसात सदर तारा व्यवस्थित न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

देवधाबा येथील श्रीकृष्ण लांडगे, संदीप लांडगे या दोघांच्या शेतातील तारा जमिनीला टेकत असल्याने शेतात मशागतीची कामे करताना जीवितहानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाल्याने आज म.रा.वि.वि अभियंता खान यांना भेटून दोन दिवसात सदर तारा ओढून ईले.पोल सरळ न केल्यास कंपनी कार्यालयातच आमरण उपोषण करण्याचा इशारा उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी दिला आहे, यावेळी शिवसेना शहर प्रमुख हरिदास गणबास, उपशहर प्रमुख बाळू पोलाखरे, संदीप लांडगे, विश्वनाथ पुरकर, संतोष लांडगे, योगेश लांडगे, मोहसीन सह आदिंची उपस्थिती होती.

# विवरा येथील अपूर्ण नाला व रस्त्याचे काम संदर्भात उबाठाचा उपोषणाचा इशारा



प्रतिनिधी १२ मे

**मलकापुर:** तालुक्यातील ग्राम विवरा येथील अपूर्ण नाला खोली करण व विवरा रणगांव अपूर्ण रस्ता पूर्ण करण्या संदर्भात दि.२८ एप्रिल २६ रोजी तहसीलदार समाधान सोनवणे यांना निवेदन दिले प्रशासनाने दखल न घेतल्याने शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांनी दि.१ मे २६ रोजी महाराष्ट्र दिनी नाल्यातच आमरण उपोषणाला सुरुवात केली होती. ग्रामपंचायत प्रशासक यांनी पाच दिवसात काम करण्याची मुदत वाढवून देण्याचे लेखी पत्र देवून आमरण उपोषणाची सांगता केली होती, मात्र पाच दिवस उलटूनही नाला खोलीकरण व अर्धवट रस्त्याचे काम पूर्ण न झाल्याने आज विवरा येथील ग्रामस्थ व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांना निवेदन देऊन पाच दिवसात काम पूर्ण न केल्यास १६ मे २६ रोजी पासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

# इब्राहीमपूर येथे घरफोडी; अडीच लाख रुपये लंपास

## अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी १२ मे

**मोताळा :** तालुक्यातील इब्राहीमपूर येथे बंद घर फोडून शेतमाल विक्रीतून ठेवलेली अडीच लाख रुपयांची रोकड अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी बोराखेडी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

अनिल सावजी श्रीनाथ (रा. इब्राहीमपूर) यांनी याबाबत बोराखेडी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, श्रीनाथ हे कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. रविवारी सकाळी साडेसातच्या सुमारास त्यांच्या वहिनी यांनी दूरध्वनीवरून घरातील कपडे अस्ताव्यस्त पडलेले असून, पेटीचे कुलूप तुटले असल्याची माहिती दिली. यानंतर श्रीनाथ व त्यांची पत्नी तातडीने घरी परतले. घराची पाहणी केली असता पेटीत ठेवलेले मका व गहू विक्रीचे सुमारे २ लाख ५० हजार रुपये चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. घरातील इतर ठिकाणी शोध घेतला; मात्र रक्कम मिळून आली नाही. त्यामुळे अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी घरात प्रवेश करून पेटीचे कुलूप तोडत रोख रक्कम लंपास केल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी बोराखेडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे. जिल्ह्यात दरम्यान, अलिकडच्या काळात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे; मात्र त्या तुलनेत चोरीच्या गुन्ह्यांच्या तपासाचा वेग आणि उलगड्यांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि. १२ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# वार्षिक उत्पन्न दहा लाख असणाऱ्यांना आता नाही मिळणार गॅसचे अनुदान

प्रतिनिधी १२ मे

**अकोला :** रेशन कार्ड ची केवायसी करण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करून नाकी नऊ आलेल्या नागरिकांना आता परत गॅस सिलेंडर साठी शासनाच्या नव्या नियमांना तोंड द्यावे लागणार आहे. रेशनकार्डनंतर आता जिल्ह्यातील ३ लाख ९२ हजार ६५ एलपीजी गॅसधारकांसाठी प्रशासनाने नव्या नियमांच्या चाळणी हाती घेतली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत या 'उज्ज्वला' योजनेच्या लाभार्थ्यांसह अनेकांच्या नावाला कात्री लागणार आहे.

## उज्वला गॅस योजनेचा लाभ घेणाऱ्यांना दरवर्षी केवायसी ची सक्ती



साहजिकच जिल्ह्यातील लाभार्थ्यांची संख्या कमी होणार आहे. जिल्ह्यात उज्ज्वला १ आणि २ या योजनेचे १ लाख ३६ हजार ३२१ लाभार्थी आहेत.

गेल्या ९ महिन्यांपासून एलपीजी सिलिंडरची उचल न करणाऱ्या लाभार्थ्यांपुढे सुद्धा नवे संकट उभे राहणार आहे. अन्न व पुरवठा विभागाच्या निर्देशानुसार ९ महिन्यांपासून सिलिंडरच्या लाभ न घेणाऱ्यांना यापुढे सरसकट लाभ मिळणार नाही. त्यांना 'केवायसी' केल्यानंतरच सिलिंडरचा लाभ मिळणार आहे. त्यासोबत मोबाईल नंबर बदल करणाऱ्यांनाही नव्याने केवायसी केल्यानंतर सिलिंडर उपलब्ध होणार आहे तशातच एलपीजी गॅस सिलिंडर अनुदानाचे नियम केंद्र सरकारकडून अधिक कडक करण्यात आले आहेत. वार्षिक उत्पन्न १० लाखांपेक्षा जास्त असलेल्या ग्राहकांना यापुढे अनुदान मिळणार नाही. जिल्ह्यातील लाखांवर लाभार्थ्यांमध्ये अनुदानित गॅस वापरणारे मोठे उद्योजक आणि व्यावसायिकांसह अन्य घटकांचा समावेश असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे या लाभार्थ्यांचे नाव यादीतून वगळले जाणार आहे. बनावट कागदपत्रांवर किंवा मृत व्यक्तींच्या नावावर असलेले गॅस कनेक्शनही बंद केले जात आहेत. आधार डेटाबेसच्या माध्यमातून या खात्यांची ओळख पटवून त्यांचे नाव वगळण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### 'उज्ज्वला'साठीही अट

◆उज्ज्वला गॅस योजनेचा लाभ घेणाऱ्यांसाठी दरवर्षी केवायसी करण्याची सक्ती करण्यात आली आहे. दरवर्षी केवायसी न केल्यास लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अनुदानाच्या रकमेचा लाभ दिला जाणार नसल्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने लाभार्थ्यांना केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा हाती घेतली आहे.

# सप्तश्रृंगी ज्वेलर्स दरोडा प्रकरणातील आरोपी गजाआड

## पिस्टलसह २५ लाखाचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १२ मे



**अकोला :** शहरातील खदान परिसरातील श्री सप्तश्रृंगी अलंकार केंद्रात बंदुकीच्या धाकावर झालेल्या लुटीचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले. ७२ तासांत एलसीबी व शहर डीबी पथकांनी आरोपीला पकडले. या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली पिस्टल, सोने-चांदीचे दागिने असा एकूण २५ लाख ५८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. न्यायालयाने आरोपीला १६ मे पर्यंत पोलिस कोठडी दि आहे. अशी माहिती पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी सोमवारी सायंकाळी पत्रकार परिषदेत दिली.फिर्यादी जितेंद्र भास्करराव विसपुते (५४) अली खदान, महादेव मंदिरासमोर, यांनी ७ मे रोजी खदान पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. दुपारी १२.४५ ते १ वाजताच्या सुमारास एक अज्ञात इसम दुकानात शिरला व पिस्टलचा धाक दाखवत सोने-चांदीचे दागिने तसेच ७५ हजारांची रोकड असा ६९ लाख ९० हजार रुपयांचा ऐवज लुटून नेला. चौकशीत आरोपीने अकोल्यातील सरकारी गोदाम परिसरात भाड्याच्या खोलीत राहत चादर विक्रीच्या बहाण्याने परिसराची रेकी केल्याची कबुली दिली. त्यानंतर ७ मे रोजी दुपारी श्री सप्तश्रृंगी अलंकार केंद्र येथे बंदुकीच्या धाकावर जबरी चोरी केल्याचेही त्याने मान्य केले. पोलिसांनी ५८० ठिकाणांचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये एलसीबीने ३३० तर शहर डीबी पथकांनी २५० फुटेजचे विश्लेषण केले. तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहितीदारांचे जाळे आणि सततचा पाठलाग करत पोलिसांनी सुमारे ७०० किलोमीटरचा प्रवास केला. पोलिसांनी आरोपीकडून अंदाजे १६० ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत २४ लाख रुपये, ४४० ग्रॅम चांदीचे दागिने किंमत १ लाख २३ हजार २०० रुपये तसेच गुन्ह्यात वापरलेला विदेशी बनावटीचा देशी कट्टा किंमत ३५ हजार रुपये असा एकूण २५ लाख ५८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तपासासाठी कर्मचारी, सात अधिकारी अशी ५० कर्मचाऱ्यांची पथके गठीत केली.तपासादरम्यान हा गुन्हा भुसावळ येथील रोहनसिंग सतनामसिंग बावरा, रा. जामनेर रोड, भिरूड हॉस्पिटलच्या मागे, भुसावळ जि. जळगाव याने केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी खडका रोड परिसरात येणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.ही कारवाई एसपी अर्चित चांडक, एएसपी बी. रेड्डी यांच्या मार्गदर्शनात एसडीपीओ सुदर्शन पाटील, पीआय शंकर शेळके, एपीआय विजय चव्हाण, पीएसआय विष्णू बोडखे, माजीदखान पठाण आदींनी केली.

# एच.पी.समर्थ गॅस एजन्सीचा गॅस ग्राहक डाटा अन्य 4 एच.पी.गॅस एजन्सीकडे वर्ग

प्रतिनिधी १२ मे

**अकोला :** एच.पी.समर्थ गॅस एजन्सी एच.पी.सी.एल. कंपनीचे विक्री अधिकारी अथर्व पानसरे यांचे मार्फत बंद केलेली आहे. त्यामुळे गॅस ग्राहक नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून गॅस सिलेंडर पुरवठा, उपलब्धता, गॅस वितरण सुरळीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता (समर्थ गॅस एजन्सीचा डाटा दुस-या एच.पी.गॅस एजन्सींना ऑनलाईन वर्ग करण्यात आला आहे.

११/०५/२०२६ पासून एच.पी.समर्थ गॅस एजन्सीतील गॅस ग्राहक नवीन क्रमांकासह ऑनलाईन डाटा वर्ग केला असून एजन्सी निहाय डाटा वर्ग करण्यात आलेला आहे. एच.पी.यदुराज गॅस सर्विस, गोरक्षण रोड, शॉप नं.७ बी.,आय.टी.स्केअर, टायटन शो रूम जवळ, एच.पी.पटेल गॅस सर्विस, शासकीय आय.टी.आय.कॉलेज समोर, नवीन बस स्टॅन्ड मागे, महसूल कॉलनी जवळ, अकोला शहर, एच.पी.विजय गॅस सर्विस, सिंधी कॅम्प, अकोला शहर आणि एच.पी. अकोला गॅस सर्विस रतनलाल प्लॉट चौक, अजहर हुसैन कॉलेज, सॅमसंग मोबाईल गॅलरी जवळ, अकोला शहर. गॅस ग्राहकांनी पुरवठा कार्यालयात कोणीही गर्दी करू नये, गॅस सिलेंडर बुकींग करीता नमुद गॅस एजन्सीमध्ये संपर्क करावा असे आवाहन केले आहे.

# पोलिसांच्या नावाने नागरिकांना लुटण्याचे सत्र सुरू

प्रतिनिधी १२ मे

## ◆ खरे सोने घेऊन खोटे दागिने हातात सोपवले

**अकोला :** काही दिवसांपासून अकोला शहरात गुन्हेगारांचे धाडस चांगलेच वाढले असून, अकोल्याच्या टिळक रोडवरील बॉम्बे लॉजसमोर तोतया पोलिसांनी एका व्यक्तीला लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आपण पोलीस असल्याचे सांगून दोन भामट्यांनी एका व्यक्तीला अडवले आणि चलाखीने त्याचे लाखो रुपयांचे दागिने लंपास केले. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

शहरातील सप्तश्रृंगी ज्वेलर्समधील चोरीची शाई अद्याप वाळलीही नव्हती, तोच भररस्त्यात पादचाऱ्याला लुटल्याची ही दुसरी मोठी घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, रमेश इंगळे हे फिरून घरी परतत असताना मोटारसायकलवरून आलेल्या दोन तरुणांनी त्यांना अडवले. विचारणा केली असता, 'आम्ही पोलीस आहोत, पुढे पोलिसांनी नाकाबंदी केली आहे, त्यामुळे तुमचे अंगावरील दागिने काढून पिशवीत किंवा जवळ सुरक्षित ठेवा,' असे त्यांनी सांगितले.

इतक्यात पाठीमागून आणखी एक तरुण दुचाकीवर आला आणि त्याने नाटक करत स्वतःचे दागिने काढून त्या दोन भामट्यांच्या स्वाधीन केले. हे पाहून रमेश इंगळे यांचा विश्वास बसला आणि त्यांनीही स्वतःची सोन्याची साखळी, लॉकेट आणि दोन अंगठ्या (एकूण किंमत ५ लाख रुपये) काढून त्यांच्याकडे दिली. बदमाशांनी सोन्याचे दागिने एका कागदात गुंडाळल्याचे भासवले आणि हातचलाखी करून खोटे दागिने असलेला कागद इंगळे यांच्या हातात दिला. त्यानंतर ते तिथून फरार झाले. काही अंतर गेल्यावर शंका आल्याने इंगळे यांनी कागद उघडून पाहिला, तेव्हा त्यात खोट्या बांगड्या असल्याचे पाहून त्यांना धक्काच बसला. रमेश इंगळे यांनी तातडीने सिटी कोतवाली पोलीस स्टेशन गाठून आपबीती सांगितली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे. विशेष म्हणजे, अशीच एक घटना ९ मे रोजी बाळापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील भिकुंड नदीच्या पुलावर घडली होती. तिथेही एका व्यक्तीला पोलीस असल्याचे सांगून त्याच्या सोन्याच्या अंगठ्या लंपास करण्यात आल्या होत्या. या सलग घडणाऱ्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे १४ मे पासून राज्यव्यापी आंदोलन



प्रतिनिधी १२ मे

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठासह राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती'ने आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या १४ मे २०२६ पासून टप्प्याटप्प्याने राज्यव्यापी आंदोलन करण्याचा अधिकृत इशारा समितीने प्रशासनाला दिला आहे. याबाबत आज विद्यापीठातील अधिसभागृहात व्दार सभा संपन्न झाली. संयुक्त कृती समितीचे समन्वयक तथा महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांनी यांनी सभेला संबोधित केले. यावेळी महासचिव नरेंद्र घाटोळ, विद्यापीठ ऑफिसर्स फोरमचे उपाध्यक्ष मंगेश वरखेडे, सचिव डॉ. विलास नांदुरकर व विभागीय कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर बारस्कर उपस्थित होते. सातत्याने पाठपुरावा करूनही शासनाने केवळ आश्वासने दिली आहेत. आता निर्णय झाल्याशिवाय कर्मचारी शांत बसणार नाहीत, अशी भूमिका समितीचे प्रमुख अजय देशमुख, डॉ. नितीन कोळी आणि शशिकांत रोडे यांनी मांडली आहे.

# बगीचे आणि मुख्य चौकांच्या सौंदर्यीकरणास घेऊन पहिल्यांदाच सत्ताधारी व विरोधकांचे एकमत

प्रतिनिधी १२ मे



**अकोला :** आज महापालिकेच्या सभागृहात संपन्न झालेल्या आमसभेत शहरातील बगीचे आणि मुख्य चौकांच्या सौंदर्यकरणास घेऊन सत्ताधारी व विरोधकांचे एकमत झाल्याचे दिसून आले. नाहीतर प्रत्येक सभेत एकमेकांच्या अंगावर धावून जाणे कागदपत्र फेकणे घोषणाबाजी करणे हे नित्याचेच झाले होते. परंतु शहर सौंदर्यकरणाच्या या मुद्द्यावर मात्र विरोधी आणि सत्ताधारी हे एकमत झाल्याचे दिसून आले. शहरातील मोर्णा नदीतील जल कुंबी काढल्यामुळे शहरात मच्छर शोधूनसुद्धा सापडत नाही अशी प्रशंसा कॉंग्रेसचे फजलू पैलवान यांनी केल्यानंतर सत्ताधाऱ्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. शिवसेनेचे सागर भारुका यांनी सुद्धा या विषयाची प्रशंसा केली घंटागाड्यांवर खर्च करण्यापेक्षा शहरातील बगीचे आणि मुख्य चौकांच्या सौंदर्यकरणावर महापालिका प्रशासनाने भर देऊन महापालिकेला ड वर्गातून क किंवा ब वर्गात आणून ठेवावे असे आवाहन केले शहरातील बगीचे आणि मुख्य चौकांचे सौंदर्यीकरण झाल्यास लोकांनाच तेथे कचरा फेकण्याची लाज वाटेल असे त्यांनी सांगितले. जुने शहरातील आझाद पार्क किल्ल्याचे सौंदर्यीकरण, तसेच हरित पार्क मध्ये सीसीटीव्ही लावणे आदीची मागणी काही नगरसेवकांनी केली. शहरातील बगीचे आणि मुख्य चौक तसेच मोकळ्या जागांचे सौंदर्यीकरण करण्यासाठी प्रायव्हेट संस्था आणि बँका आदींना हे काम सोपविल्यानंतर हींग लगेना फिटकरी लेकिन रंग चोखा का चोखा असे हे काम होणार आहे असे भाजपाचे विनोद मापारी म्हणाले परंतु या संस्थांना हे सौंदर्य करण्याचे काम दिल्यानंतर त्यांची जाहिरात किती राहील, सौंदर्यीकरण कसे करतील याबाबत योग्य इंजीनियर किंवा आर्किटेक कडून प्लॅनिंग करून त्यांना दिले पाहिजे अशी ही मागणी त्यांनी केली. त्यामुळे एकंदरीतच शहर सौंदर्यकरणाच्या मुद्द्यावर पहिल्यांदाच विरोधक आणि सत्ताधारी यांच्यात एकमत झाल्याचे दिसून आले

# शेगावच्या मंदिरात मोबाईल वापरावर पूर्ण बंदी भाविकांना संस्थानचे महत्वाचे आवाहन

प्रतिनिधी १२ मे



**शेगाव :** श्री संत गजानन महाराज संस्थान हे देशभरात शिस्त, सेवा आणि पवित्रतेसाठी ओळखले जाते. मात्र, काही भाविकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे चित्र समोर येत आहे. मंदिर परिसरातील पावित्र्य राखण्यासाठी संस्थानने आता अधिक कडक भूमिका घेतली आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात गजानन महाराज यांच्या मूर्तीचे छायाचित्र काढण्यास स्पष्ट मनाई असतानाही काही भाविकांकडून मोबाईलवर फोटो काढले जात असल्याच्या घटना वाढल्या आहेत. यामुळे इतर भाविकांच्या दर्शनात अडथळा निर्माण होतो, तसेच मंदिरातील शांतता आणि आध्यात्मिक वातावरणाला धक्का बसतो. याच पार्श्वभूमीवर संस्थानने महत्त्वाचा निर्णय घेत, संपूर्ण मंदिर परिसरात मोबाईल वापरावर सक्त बंदी लागू केली आहे. मंदिरात प्रवेश करताना मुख्य प्रवेशद्वारावरच मोबाईल बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जर कोणी मोबाईल वापरताना आढळले, तर तो मोबाईल तात्काळ जप्त करण्यात येणार असल्याची स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. संस्थानने भाविकांना आवाहन केले आहे की, श्रींचे सहज, सुरक्षित आणि निर्विघ्न दर्शन व्हावे, तसेच गर्दीचे व्यवस्थापन सुरळीत ठेवण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यंत गरजेचे आहे. मोबाईल जप्त झाल्यानंतर होणारा मानसिक त्रास आणि वेळेची नासाडी टाळण्यासाठी भाविकांनी सहकार्य करावे, असेही नमूद करण्यात आले आहे.

# जुना किराणा बाजारात तीन ते चार दुकानात चोरी आणि चोरीचा प्रयत्न

प्रतिनिधी १२ मे



**अकोला :** सध्या शहरात चोरी व लुटमारीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झालेली दिसून येत आहे. काल सोमवारी टिळक रोडवरील मामा बेकरी जवळ पोलीस असल्याचे सांगत एका व्यक्तीच्या सोन्याच्या अंगठ्या व सोन्याची चैन लांबवण्याची घटना समोर आली आहे तर आज मंगळवारी जुन्या किराणा बाजारातील तीन ते चार दुकानांमध्ये चोरी व चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याचे उघडकीस आल्याने परिसरातील अन्य व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे आज सकाळी व्यापारी आपली दुकाने उघडण्यासाठी आले असता त्यांना आपल्या दुकानाचे शटर उघडल्याचे दिसून आले ज्यामध्ये लीलाधर ट्रेडर्स यमुना ट्रेडर्स मुकेश ट्रेडर्स या तीन दुकानांमध्ये चोरी झाल्याचे आढळून आले तर लीलाधर ट्रेडर्स व यमुना ट्रेडर्सच्या दुकानाचे शटर तोडण्याचा चोरट्यांनी प्रयत्न केल्याचे दिसून आले. या घटनेबाबत व्यापाऱ्यांनी सिटी कोतवाली पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करीत पुढील कारवाई सुरुवात केली आहे या दुकानांमध्ये किती रुपयांची चोरी झाली. याबाबत अधिकृत माहिती बातमी लिहिस्तोवर मिळाली नव्हती. या परिसरात दर रविवारी जुन्या वस्तूंचा बाजार भरतो. याआधी परिसरात झालेल्या चोरीमुळे हा बाजार प्रशासनाने बंद करण्याचे आदेश दिले होते परंतु परत हा बाजार सुरू झाल्याने चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

## परिसरातील अन्य व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

### परिसरात पोलिसांची गस्त वाढविणे गरजेचे

◆किराणा बाजार परिसरात रात्रीची गस्त वाढवण्याची मागणी व्यापारी करीत आहेत या आधी सुद्धा या परिसरातील दुकानांमध्ये चोरीच्या घटना घडल्या आहेत दुकानांच्या बाहेर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे अज्ञात समाजकंटक तोडून टाकीत आहेत त्यामुळे बाहेरचे कॅमेरे बंद ठेवले आहेत फक्त आतील दुकानांमध्ये कॅमेरे सुरू असल्याची माहिती कुशल साहनी नामक व्यापाऱ्याने दिली

# बाळापूर हायवे चौकी समोर पेट्रोल-डिझेल माफियांवर धडक कारवाई

प्रतिनिधी १२ मे

## ◆ २६५० लिटर पेट्रोल डिझेल व इथेनॉल चा साठा जप्त

**अकोला :** जिल्ह्यातील बाळापूर-खामगाव राष्ट्रीय महामार्गालगत हॉटेल वन स्टॉपच्या मागील परिसरात अवैधरित्या साठवून ठेवण्यात आलेल्या मोठ्या प्रमाणातील पेट्रोलियम पदार्थांवर प्रशासनाने संयुक्त धडक कारवाई करत २६५० लिटर ज्वलनशील साठा जप्त केला. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध इंधन साठेबाजांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. अकोला जिल्यात बहुतांश ठिकाणी अवैध पेट्रोलियम पदार्थांची साठेबाजी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे, अशाच एका ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, घटनास्थळी अंदाजे ६०० लीटर पेट्रोल, ४०० लीटर डिझेल आणि तर १६५० लीटर इथेनॉल असा धोकादायक व ज्वलनशील साठा आढळून आला. हा साठा बाळापूर-खामगाव महामार्गावरील हायवे पोलीस चौकीजवळ असलेल्या हॉटेल वन स्टॉपच्या मागील परिसरात लपवून ठेवण्यात आला होता. सदर प्रकरणात अकोला येथील शेख रिजवान शेख इमरान याला ताब्यात घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. सदरची कारवाई जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात जिल्हा पुरवठा अधिकारी रविंद्र येन्नावार, निरीक्षण अधिकारी विनीत ताले, योगेश सातव तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी यांच्या पथकाने संयुक्तरीत्या ही कारवाई केली. प्रशासनाच्या या धडक मोहिमेमुळे जिल्ह्यात बेकायदेशीररित्या पेट्रोलियम पदार्थांचा साठा करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणात ज्वलनशील पदार्थांचा साठा महामार्गालगत आढळल्याने मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नव्हती. अकोला जिल्यात इतर ठिकाणी सुद्धा पेट्रोल डिझेल चा काळाबाजार मोठ्या प्रमाणात सुरू आहे, त्या ठिकाणी सुद्धा प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी होत आहे..


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK